म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय वा. वा.
दा. क्र. २६९२

वा. वा. २२३ क्रमांक २६९२

२६९२

# चिनी कथा-कुंज

IRBK-0102612
IRBK-0102612

# चिमणी कथा कुंज

दा. क्र. २६९२

म. ग्रं. सं. ठाणे
विषय बा. वाङ्मय
क्र. नं. 323

22 JUN 1975

-9 MAR 1972

२६९२

IRBK-0102612

IRBK-0102612

—श्रीपाद जोशी

# चिनी कथा-कुंज

( चार चिनी अनुवादित कथा )

अनुवादक:

**श्रीपाद जोशी**

सरस्वती प्रकाशन
क्रमांक ११

मूल्य
१२ आणे

# कथानुक्रम

१ आत्महत्या ... ... ... १

नजराणा ... ... ... २०

३ तो दिवस ... ... ... ३१

४ सभा ... ... ... ४०

: मुद्रक :

**स. रा. देशपांडे**

लक्ष्मी मुद्रणालय ८६५ सदाशिव पेठ, पुणें २.

: प्रकाशक :

**के. एस. गुर्जे**

६९१ बुधवार पेठ, पुणें २.

: एकमेव विक्रेते :

**" सरस्वती प्रकाशन "**

८६५ सदाशिव पेठ, पुणें २.

# कुंजांतील कुजबूज............

१९४२ सालीं मी एकदां दिल्लीस गेलों असतां तेथील ‘ अंजुमने तरक्कीए उर्दू ’ या संस्थेंत काम करणाऱ्या तमन्नाई या बिहारी मुस्लिम तरुणाशीं परिचय झाला. त्यानें केलेला चिनी कथांचा उर्दू अनुवाद त्या वेळीं नुकतांच प्रसिद्ध झाला होता. त्याचें नांव ‘ जिन्दा चीन ’. त्यानें आपलें तें पुस्तक मला भेट म्हणून दिलें आणि जमल्यास त्यांतील कथांचा अनुवाद मराठींत व्हावा अशी इच्छा प्रदर्शित केली.

त्यानंतर येरवड्याच्या कृष्ण मंदिरांत असतांना मजजवळ उर्दू शिकणाऱ्या मित्रांना मी ‘ जिन्दा चीन ’ वाचावयास दिलें. त्यांनाहि तें पुस्तक आवडलें. व मी त्याचें मराठींत भाषांतर करावें अशी त्यांनीं इच्छा दर्शविली.

तोंपर्यंत माझी अशी कल्पना होती कीं श्री. तमन्नाई यांनीं मूळ चिनी भाषेंतूनच या गोष्टी उर्दूंत आणल्या असाव्यात. परंतु एके दिवशीं श्री. वेल्स नांवाच्या अमेरिकन लेखकाचें ‘ इम्मॉर्टल चायना ’ हें इंग्रजी पुस्तक हातीं पडलें. त्यांतहि याच कथा होत्या. त्यावरून असें दिसून आलें कीं, श्री. तमन्नाई यांनीं वेल्सच्या पुस्तकावरूनच अनुवाद केला होता. अर्थात् यामुळें माझ्या अनुवादांत न्यूनता येण्याचें कांहींच कारण नव्हतें. म्हणून मी सदर अनुवाद प्रकाशित करण्याचें ठरविलें.

एकूण नऊ गोष्टींपैकीं पांच गोष्टींचा एक लहानसा संग्रह पुण्याच्या चित्रशाळेनें आपल्या ‘ शिरीष मालें’तून ‘ अमर चीन ’ या नांवानें नुकताच प्रसिद्ध केला आहे. उरलेल्या चार कथांपैकीं ‘ आत्महत्या ’ ही कथा ‘ सत्यकथेमध्यें आणि ‘ सभा ’ ही ‘ यशवंत ’ मध्यें प्रसिद्ध झालेली आहे. ‘ सत्यकथे’चे संपादक श्री. विष्णुपंत भागवत यांनीं सदर कथा या संग्रहांत घेण्यास परवानगी दिली याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

हा कथाकुंज प्रकाशित करण्याचें धाडस केल्याबद्दल माझे मित्र श्री. स. रा. देशपांडे यांचेहि आभार मानले पाहिजेत.

या संग्रहांतील ‘ नजराणा ’ या कथेबद्दल मला थोडें सांगावयाचें आहे. या कथेंत कम्युनिस्टांचा हातोडा व कोयता यांनीं युक्त असलेला लालबावटा आणला गेला आहे. येथील कम्युनिस्टांच्या राष्ट्रविघातक धोरणामुळें चिडून

गेलेल्या कांहीं संपादकांनीं एवढ्यासाठींच ही गोष्ट छापण्यास नकार दिला. एका संपादकांनीं मला असें सांगितलें कीं "ही गोष्ट तशी फार छान आहे. परंतु यांत कम्युनिस्टांचा झेंडा दाखविला त्या ऐवजीं तुम्ही तिरंगी ध्वज दाखवा म्हणजे ती आम्ही छापूं" अर्थांत मी असें करण्यास नकार दिला. कारण मला तत्वतःच ही गोष्ट मान्य झाली नाहीं. भारतीय साम्यवादी अत्यंत राष्ट्रद्रोही आहेत हें मान्य असूनहि त्यांच्या झेंड्याबद्दल आपण तिरस्कार किंवा द्वेष बाळगावा हें मला पटत नाहीं. कारण या झेंड्याचा इतिहास इतका उज्वल आहे कीं त्यांत भारतांतीलच काय पण साऱ्या जगांतील कम्युनिस्टांचीं कृष्णकृत्यें विलनि होऊन जावींत आणि म्हणून ही गोष्ट मी आहे त्याच स्वरूपांत कायम ठेवली आहे.

शाहुपुरी (कोल्हापूर)
९ ऑगस्ट १९४७.

—श्रीपाद जोशी.

★

# आत्महत्त्या

: : मूळ लेखक : माव तून

हुवान हियो चिह मुस्तपणें खिडकीशीं उभी राहून अन्यमनस्कतेनें धुक्यांतून पुसट पुसट दिसणाऱ्या समोरच्या तळ्याकडे पहात होती. तळ्याच्या कांठांवरून येणारे आवाज तिला अस्पष्ट ऐकूं येत होते. बालकथेंतील एखाद्या चिंताग्रस्त राक्षसाप्रमाणें दिसणाऱ्या पर्वताच्या पुढें आलेल्या काळसर शिखराकडे ती मधूनच पाही. तळ्याच्या कांठीं जी लहान लहान दिव्यांची एक माळच माळ दिसत होती ते वास्तविकपणें तळ्याकांठच्या बंगल्यांतील दिवे होते. या बंगल्यांतून राहणारे लोक चांगले सुस्वरूप होते आणि त्यांच्या दृष्टीनें तें सारें दृश्यहि सुंदरच होतें.

हुवान हियो चिहला मात्र हें मान्य नव्हतें. तिला तें सर्व अगदीं व्यर्थ वाटत होतें. आपल्या जीवनाचे अगदीं तुकडे तुकडे होत आहेत असा तिला भास होई. आपल्या शरीरांत प्राण नाहीं कीं तारुण्य नाहीं, जगांतील सारें सौंदर्य आपल्याला चिडवीत आहे असें तिला वाटूं लागलें. ती स्वतःला

आपल्या लहानशा खोलींत कोंडून घेऊं इच्छित होती. कारण तेथें राहिल्यानें मनांतील वैराग्य थोडें फार कमी करतां येईल असें तिला वाटत होतें.

लोकांसमोर तिला गोंधळून गेल्यासारखें होई; आणि म्हणून तिनें आपण होऊन एकान्तवास व एकलकोंडेपणा पत्करला होता. लोक जेव्हां बोलतांना किंवा हंसतां हंसतां एकदम थांबत, तेव्हां त्यांचे डोळे आपल्यावरच रोखले गेले आहेत याबद्दल तिची खात्री होई. त्यांचे अर्धवट उघडलेले ओंठ जणुं असेंच म्हणत, "आम्हांला माहीत आहे! आम्हांला माहीत आहे सर्व!!" आपले जुने जिवलग मित्रहि आतांशा आपल्याशीं जरा फटकूनच वागत आहेत असें तिला वाटे. आणि जेव्हां ते तिच्याशीं गप्पा मारीत तेव्हां ते आपल्याकडे अर्थपूर्ण नजरेनें पाहून गालांतल्या गालांत हंसत आहेत असा तिला भास होई. सगळेजण आपल्यावर खोटाच आरोप लादत आहेत या बद्दल तिची खात्री होऊन चुकली होती.

जेव्हां ते रोमियोज्युलिएट किंवा लैलामजनूंसारख्या प्रेमी युग्मांच्या प्रणयकथांसंबंधीं गप्पा मारीत तेव्हांसुद्धां तिला वाटे कीं हें सर्व बोलणें आपल्याला टोमणे मारण्याच्या उद्देशानेंच चाललें आहे. 'लेकी बोले सुने लागे' अशांतला सगळा प्रकार आहे. यामुळें नेहमीं कुठेंतरी सांदी-कोपऱ्यांत पडून राहणेंच बरें असें तिला वाटे. पण जेव्हां ती वेळ घालविण्यासाठीं म्हणून गोष्टींचीं पुस्तकें वाची तेव्हां तिला वाटे कीं प्रत्येक लेखकाला आपलें गुपित समजलेलें आहे; आणि प्रत्येक गोष्ट आपल्याच दुःखपूर्ण जीवनाविषयीं लिहिली गेलेली आहे. आपली मावशी, मावसभाऊ, व मावस-वहिनी (ज्यांच्याबरोबर ती रहात होती)—यांना मात्र आपल्या या घटनेबद्दल कांहीं एक समजलेलें नाहीं याबद्दल तिला खात्री वाटत होती. कारण नाहींतर मग...

तिनें खांदे उडवून अंग शहारल्यासारखें केलें. तिचे डोळे भरून आले. ती आपल्या मनाशीं जोरजोरांत विचार करूं लागली कीं 'जग खरोखर मोठें गोंडस आहे. विलोभनीय आहे. मग माझेंच नशीब तेवढें जगावेगळें कां असावें?' सर्व सामान्य मनुष्याचें जीवन कंठण्याचें आतां आपल्या नशिबीं नाहीं' हा विचार जेव्हां तिच्या मनाला चाटून जाई तेव्हां तिच्या दृष्टीनें जीवनांची किंमत एकदम भरमसाट वाढे. तिच्या ज्या निर्णयामुळें तिला हें कधींहि

न संपणारें दुःख मिळालें होतें तो निर्णय फिरविणें आतां तिच्या हातीं नव्हतें. ज्या क्षणिक सुखाच्या मोहाला वश होऊन तिनें हें ओझें उरावर घेतलें होतें, तें सुख कधींच विरून गेलें होतें. हें दुःख मात्र दुसऱ्या कोणत्याही उपायानें नाहींसें होणारें नव्हतें. तें कांहींहि असो. मानवी निर्दयता ही तिच्या दृष्टीनें कधींहि समाप्त न होणारी अशी व्यथा होती. आपल्याकडे पाहणाऱ्या प्रत्येक चेहेऱ्यावर, प्रत्येक डोळ्यांत आणि आपल्याकडे पाहून हलणाऱ्या प्रत्येक ओठांत ही निर्दयता भरल्याचा तिला भास होई.

स्फुंदत स्फुंदत तिनें धाडदिशीं बिछान्यावर अंग टाकलें. आणि भावावेगानें उशीला छातीशीं घट्ट आवळून धरलें. तिचें हृदय जोरजोरांत धडधडत होतें. आणि हळूं हळूं म्हणत होतें, ‘ आत्महत्त्या ! आत्महत्त्या कर ! ! ’ तरीपण आत्महत्त्येनें काम भागण्यासारखें नव्हतें. ती आपल्याबरोबर साऱ्या सुंदर जगाला धुळीस मिळवूं इच्छित होती. स्वतःच्या हातांनीं या जगाला आग लावूं इच्छित होती. अशी आग कीं जिच्यांत सगळ्या वस्तु, लोक, त्यांचीं सुखदुःखें इतकेंच काय पण मानवजातीचें नांव–निशाणसुद्धां जळून खाक होऊन जावें !

रागाच्या झटक्यांत ती एकदम उठून बसली. आणि विषारी नजरेनें तिनें खोलींत सभोंवार पाहिलें. तिचा चेहरा लालबुंद झाला; आणि त्यांतून एक अद्‌भुत सौंदर्य ओसंडूं लागलें. ती जोरानें टेबलाकडे धांवली आणि तिनें खस्‌दिशीं टेबलाचा एक कप्पा पुढें ओढला. त्यांतून किल्ली घेऊन दुसरा खण उघडला. यांत कांहीं जुनीं पत्रें, कांहीं फोटो आणि एक छोटीशी कातडी हँडबॅग होती. तिनें या बॅगेंत हात घालून एक फोटो बाहेर काढला, आणि त्याचे तुकडे तुकडे करून टाकले; यानंतर जणुं तिचें सगळें अवसान गळालें. शेजारच्या खुर्चीत तिनें धाडदिशीं अंग टाकिलें; आणि हुंदके देत देत ती रडूं लागली. थोड्या वेळानें मान वर उचलून ती उद्गारली, “चूक त्याचेकडे नाहीं; मजकडेच आहे ! ”

तिनें खालीं वांकून फोटोचे तुकडे गोळा केले आणि ते मांडीवर ठेवून काळजीपूर्वक जोडूं लागली. एकादी आई रागाच्या भरांत चुकीनें आपल्या मुलाला मारते आणि मग स्वतःच पश्चात्तापपूर्ण स्वरानें त्याची समजूत घालूं लागते. अगदीं तशीच स्थिति हुवानची झाली होती. ती खरोखरीच

त्याच्यावर प्रेम करीत होती. आपलें त्याच्यावर अजूनहि अक्षय प्रेम आहे याबद्दल तिनें आपल्या मनाला निक्षून बजावलें मोठ्या भावावेगानें तिनें त्या फोटोचें चुंबन घेतलें, त्याच्या डोळ्यांचें, त्याच्या ओठांचें तिनें पटापट मुके घेतलें. आपल्याला त्याच्याबद्दल तिरस्कार वाटतो आहे अशी तिनें कां बरें समजूत करून घेतली? तो तिच्या जीवनांतील सर्वांत महत्त्वाचा घटक होता. फी लाईच्या डोंगरमाथ्यावरील घटनेमुळें तिला अजूनहि दुःख होत होतें. तरीपण आपण आपल्या जीवनाचें सर्वस्व दान केल्याची आठवण होतांच तिला असें वाटूं लागलें कीं आपण त्याची स्मृति एखाद्या मौल्यवान् दागिन्याप्रमाणें जपून ठेवली पाहिजे. कुठवर? किती काळ? अखंड!

त्याच्या आठवणीनें तिच्या पोटांत कालवाकालव होऊं लागली. तिचा चेहरा लाजेनें लाल झाला. सारें शरीर गळून गेल्याचा तिला भास झाला. ती हळूं हळूं पुटपुटूं लागली:—

"त्याचा तरी यांत काय दोष? माझ्याहि हृदयांत त्याच्याबद्दल ओढ नव्हती का? त्या तशा जागीं आणि त्या तशा वातावरणांत कोणत्याहि प्रियकरानें असेंच केलें नसतें का? त्या ठिकाणीं भगवान बुद्ध बसले होते. तेहि याला साक्षी आहेत. त्याच्या ठिकाणीं मला कसल्याहि प्रकारची अनुचित व लज्जास्पद विकारी वृत्ति दिसली नाहीं. आपण एक मोठें स्वप्नच पहांत आहोंत असा मला भास होत होता. त्यानें घेतलेलीं चुंबनें व दिलेलीं आलिंगनें या त्या स्वप्नांतीलच गोष्टी होत्या जणुं! होय! दुसरे दिवशीं त्याच्या खोलीवर जाऊन त्याला भेटण्यांत चूक झाली खरी. पण तें टाळणें अगदीं अशक्यच होतें. कोणती तरी दुर्दमनीय शक्ति मला तेथें ओढून घेऊन गेली."

त्या दिवशींच्या गोष्टी आठवण्याचा तिनें प्रयत्न केला. तेथें जाण्यासाठीं आपण आपल्या मनाची कशी समजूत घातली होती हें ती आठवूं लागली. त्या सर्वांचें तात्पर्य एवढेंच होतें कीं भावनांना उद्दीपित करणाऱ्या शरीराच्या बाह्य भागांचा जेव्हां त्यानें मनमुराद उपभोग घेतला तेव्हां अंतिम विजयाची खूण मागें ठेवण्याच्या त्याच्या प्रयत्नास तिनें कां व कसा विरोध करावा? आणि म्हणून अखेर शेवटीं तिनें आपलें सर्वस्व त्याच्या हवालीं केलें. आत्म्याचें परमात्म्याशीं मीलन होतांना जो आनंद होत असेल तशा आनंदाच्या

भरांत तिनें त्याचें पूर्णपणें स्वागत केलें. ती जेव्हां तिसऱ्यांदा त्याला भेटण्यासाठीं त्याच्या खोलीवर गेली तेव्हां तो तेथून निघून गेला होता. तिच्या नांवचें एक पत्र व आपला एक फोटो तो मागें ठेवून गेला होता. बस्स हीच सुरवात आणि हाच शेवट !

हुवान हियो चिह नें एक उसासा टाकला आणि ते फोटोचे तुकडे कातडी बॅगेंत भरले. ती खिडकीशीं येऊन उभी राहिली आणि अन्यमनस्कतेनें निळया निळया आकाशाकडे, ज्यांच्या मागून पिवळा धमक पूर्णचंद्र सोन्याच्या थाळीप्रमाणें चकाकत वर येत आहे अशा ढगांच्या आडव्यातिडव्या तुकड्यांकडे आणि बागडणाऱ्या मुलांप्रमाणें लुकलुकणाऱ्या असंख्य ताऱ्यांकडे पाहूं लागली. तिचे अस्ताव्यस्त व गुंतागुंत झालेले विचार त्याच त्या प्रश्नाकडे पुन : पुन : धांव घेत होते. तो प्रश्नहि असा होता कीं जो तिच्या मेंदूच्या पडद्यावर प्रत्येक खेपेस निरनिराळ्या प्रकारच्या रेघोट्या ओढून नवीन नवीन आकृत्या व चित्रें तयार करीत होता.

" मी वाजवीपेक्षां जास्त मोकळेपणानें, जास्त बेसावधपणें वागलें कां ? या खड्डयांत येऊन पडण्याची मला कांहीं जरूर होती कां ? माझ्यावर प्रेम करणारा तो रंगेल जवान होता तरी कोण ? खरोखरीच भावनाशील वृत्तीचा तरुण होता कीं कुमारिकांना भ्रष्ट करण्याचा धंदाच करणारा कुणीतरी राक्षस होता ? कीं नुसती गंमत म्हणून कुमारिकांची शिकार करणारा व त्यांनीं आपल्या तावडींतून निसटून जाण्याचा प्रयत्न करूं नये म्हणून त्यांच्या भोंवतीं कपटी प्रणयाचें जाळें पसरवून ठेवणारा सैतान होता ? त्यानें पहिल्यापासूनच हें सर्व ठरवूनच केलें असेल कां ? त्याचें हें पत्रहि त्याच्या या हलकट इराद्याचेंच सूचक तर नसेल ना ? मजसारख्या आणखी किती कुमारिकांशीं तो हा कपटखेळ खेळला असेल कोण जाणे ! त्यानें लिहिलेल्या गोष्टी अगदीं झूटच असतील कां ? आणि मी तरी असा निर्बुद्धपणा कां करावा ? एक कपटी तरुण आणि खरा प्रियकर यांतील फरक न कळण्याइतकी मी खरोखरीच अननुभवी होते कां ? तो अत्यंत सुंदर होता म्हणूनच कां मी त्याच्या जाळ्यांत सांपडलें ? त्या मधुर स्वप्नाचा थोडासा अनुभव घेण्यासाठीं साऱ्या आयुष्याची नासाडी करावी लागेल हें मला कळायला नको होते कां ? माझें शरीर खरोखरींच अपवित्र झालें आहे काय ?..." नाहीं ! मुळींच नाहीं ! ! "

तिचें मन व तिचा अंतरात्मा एकदम ओरडून सांगत; " असें असणें शक्य नाहीं. इतर मुलींनीं माझ्याहून जास्त निष्काळजीपणा व बेपर्वाई केली आहे पण त्यांच्या बाबतीत माझ्यासारखें कांहीं घडलेलें नाहीं. यावरून तो कपटी नव्हता हें उघड आहे. त्याचें निघून जाणें अगदीं आवश्यक झालें असलें पाहिजे, याबद्दल माझी खात्री आहे. इतरांच्या सुखासाठीं स्वतःच्या सुखावर पाणी सोडून तो निघून गेला. त्याचें व्यक्तिमत्व फार मोठें आहे. त्याच्यावर जबाबदाऱ्याहि खूप आहेत. प्रेम आणि लग्न या सारख्या गोष्टींविषयीं बोलणें काढणें सुद्धां त्याला शक्य नाहीं. त्याचें जीवन ज्या प्रकारचें आहे तशा प्रकारच्या जीवनांत असल्या गोष्टींचा विचारहि डोक्यांत आणणें पाप आहे."

" पण तो असेंहि म्हणाला होता ना कीं, 'माझ्या–ठिकाणीं वासना व मनोविकार अत्यंत प्रबल आहेत व स्त्रीच्या आकर्षणापुढें माझें कांहीं चालत नाहीं म्हणून?"

हुवान हियो चिहला आठवलें की त्याला आपल्याकडे आकर्षित करण्यासाठीं आपण स्वतःच किती प्रयत्न केले होते. तिला मनापासून वाटत होतें कीं त्यानें आपल्याला आपल्या बाहुपाशांत घेऊन जोरानें आवळावें–तिला एकदम लाज वाटूं लागली; आणि तिनें आपलें तोंड दोन्ही हातांनीं झांकून घेतलें.

तो निघून गेला आहे असें समजतांच आपण त्याचा पाठलाग कां केला नाहीं? आग, पाणी, वारा, वादळ या सर्वांना तोंड देत आपण त्याच्याबरोबर जगाच्या दुसऱ्या टोंकापर्यंत कां गेलों नाहीं? याबद्दल तिला आतां पश्चात्ताप वाटूं लागला. तिच्या अंतःकरणांत आशेचा एक नवा किरण प्रगट झाला.–'कदाचित् तो परतहि येईल!' ज्यानें एकाद्या विराट् कार्यासाठीं मानव्याच्या एका मोठ्या ध्येयासाठीं आपले प्राण पणास लावले आहेत असा प्रियकर मिळाल्यास कोणत्याही तरुणीला कां बरें अभिमान वाटणार नाहीं? कां बरें धन्यता वाटणार नाहीं?

पण त्याच्या लिहिण्याप्रमाणें पाहिल्यास जोंपर्यंत क्रांति यशस्वी होत नाहीं तोंपर्यंत त्याच्या परत येण्याची कांहीं आशा नाहीं. तो तिच्या जवळ म्हणाला होता, " जोंपर्यंत माझ्या कुडींत प्राण आहे तोंपर्यंत मी क्रांतीसाठीं लढत

राहणार !" आणि म्हणून जोंपर्यंत मृत्यु स्वतः येऊन त्याला जीवनाच्या बंधनांतून सोडवीत नाहीं तोंपर्यंत तो आपल्या कर्तव्याकडे दुर्लक्ष करूं शकत नाहीं. तो म्हणाला होता, "त्या ठिकाणीं मी एकट्यानेंच जाणें योग्य होईल. तुला बरोबर नेऊन माझ्याबरोबर तुझाहि सर्वनाश करण्याची माझी इच्छा नाहीं !"

अंधारानें तिच्या अंतःकरणाला पदराखालीं घेतलें. तिला जरा बरें वाटलें. आतां ती गंभीरपणें विचार करूं लागली. तो तिच्या प्रेमास अपात्र नव्हता; व त्याचें प्रेम खरोखरीच पवित्र होतें याबद्दल तिची खात्री पटूं लागली. तिच्या हृदयावरील दडपण कमी झालें. ती स्वतःशींच खुदकन् हंसली. "पूर्वींच कां बरें मला हें कळलें नाहीं ? इतके दिवस मी या प्रेमास कां बरें अपवित्र समजत होतें ? यांत जगापासून लपविण्यासारखें तें काय आहे ? तिनें एका पुरुषावर प्रेम केलें होतें आणि तें प्रेम फळास आलें होतें. तिच्या प्रियकरानें मानवजातीच्या सर्वोच्च ध्येयप्राप्तीसाठीं मोठ्या करारीपणानें आपल्या प्रेमावर पाणी सोडलें होतें. या घटनेनें तिच्या प्रेमाचें श्रेष्ठत्वच सिद्ध होत नव्हतें कां ? ही काय साधीसुधी गोष्ट होती ?

रात्रींच्या शांत, निःस्तब्ध कुशींत पडल्या पडल्या तिला स्वप्न पडूं लागलें—पुष्कळसे लोक गोळा झाले आहेत. ते तिच्या उच्च व उदात्त प्रेमाची हकीकत लक्ष लावून ऐकत आहेत. प्रत्येक जण तिची प्रशंसा करीत आहे. तिच्या क्रांतिकारक प्रियकराच्या त्यागाचे आणि धडसाचे पोवाडे सर्वजण मोठ्या उत्साहानें गात आहेत. इतक्यांत तिला असें दिसलें कीं तिचा प्रियकर येत आहे. त्याच्या विशाल व भरदार छातीवर कितीतरी लाल पदकें लटकत आहेत. त्याच्या शौर्याचे ते चकचकीत पुरावेच होत जणुं !......

पण...रात्र निघून गेली आणि दिवसानें उघड उघड दिसणाऱ्या गोष्टी-सहित तिच्या खोलींत प्रवेश केला. बाहेरील आवाजानें तिची झोप मोडली, आणि ती पुन्हां एका निःस्वप्न जगतांत आली. गेल्या रात्रींची शांतता नाहींशी झाली होती. तोच अविश्वास व तेंच भय पुन्हां परत आलें. कालच्या प्रमाणेंच आज देखील तिनें दुःखानें व निराशेनें स्वतःला खोलींत कोंडून घेतलें.

वर्तमानपत्रांत मन गुंतवावें म्हणून तिनें तीं चाळण्यास सुरवात केली. पण

त्यांत मोठमोठ्या शीर्षकांखाली निर्जीव लोकांच्या निरर्थक हकीकतीशिवाय दुसरें कांहींच नव्हतें. मात्र प्रत्येक अक्षर आपल्याकडे तुच्छतेनें व रोखून पहात आहे असा तिला भास होऊं लागला. तिनें एक जुनी कादंबरी हातीं घेतली. तिच्यांत 'एक भोळीभाबडी, भावनावश तरुणी व एक मरतुकडा तरुण' यांची गोष्ट होती. तिनें ती कादंबरी फेकून देऊन दुसरी एक नवीन कादंबरी चाळण्यास सुरवात केली; पण तिच्यांत पूर्वीपेक्षांहि अचरट गोष्टी लिहिलेल्या होत्या.

हातांतील पुस्तक निष्काळजीपणानें भिरकावून देऊन ती अंथरुणावर पडली. आतां आपण कसला कसला म्हणून विचार करावयाचा नाहीं असा तिनें मनाशीं निश्चय केला. तिनें उदासपणें आकाशांतील ढगांकडे पाहिलें व त्यांच्या गमतीदार आकृतींचें निरीक्षण करूं लागली. त्या ढगांतून हुबेहुब तिच्या मावशीसारखी एक बाई तिला दिसूं लागली. त्याच्याजवळच एका ढगानें धांवत्या घोड्याचें रूप धारण केलें आणि तो जवळ जवळ येऊं लागला. अरे, पण या घोड्याची आतां मोठी मजेशीर गाडी बनून गेली कीं! त्या गाडीला खरोखरीच खिडक्या होत्या आणि त्यांतून एका पुरुषाचा चेहरा बाहेर डोकावत होता. ज्याप्रमाणें तेलाचा थेंब कागदावर पडतांच तो पसरूं लागतो त्याप्रमाणें तो चेहरा मोठा होऊं लागला. आणि तो थेट आपल्याकडेच येत आहे असा तिला भास होऊं लागला. अरे हा तर तिच्या प्रियकराचा चेहेरा!—पण तिनें त्याला ओळखतांच सारें चित्र एकदम पुसलें गेलें.

तिनें हळू हळू डोळे मिटले, आणि ती विचार करूं लागली, "तो खरोखरीच गाडींत असेल. आजच्या दिवसांत तो कदाचित येथें येऊनहि पोहोचेल. मी जर आज फिरायला म्हणून बाहेर पडलें तर कदाचित् अचानकपणें तो मला वाटेंतच भेटेल. किंवा कदाचित् पूर्वी जिथें आम्ही एकमेकांना भेटलों होतो तिथें तो माझी प्रतीक्षा करीत बसला असेल, किंवा"

ती उठली—आणि बाहेर आली. जवळच फळाफुलांच्या झाडांनीं भरलेली एक सुंदर बाग होती. समोरच्या सरोवराचें स्फटिकासारखें शुभ्र स्वच्छ पाणी अगदीं शांत होतें. समोरच दगडी चबुतऱ्यावर एक तरुण

बसला होता. तिनें पुढें वांकून त्याचे खांदे गदगदा हलवले आणि भावनोद्रेकानें ती जोरांत उद्गारली :

"अखेर आलास म्हणावयाचा तूं!"

"हं ऽऽ!"

"तर मग आपण लग्न करूं! मी आपल्या सगळ्या मित्रांना सांगूं शकेन कीं तूं प्रतारणा करणारा नाहींस. सगळ्या जगाला माहीत होईल कीं तूं प्रामाणिक आहेस, तू खरोखरीच मजवर प्रेम करतोस..."

"मी प्रतारणा करणारा नाहीं; पण तुझा पति बनणेंहि मला शक्य नाहीं."

"पण आपण..."

"...एकमेकांना सर्वस्वदान देऊन चुकलों आहोंत! असंच ना? खरं आहे. पण तूं तें आतां विसरून जा. त्यांतच कल्याण आहे. तुझा पति बनणें मला शक्य नाहीं. तूं चांगली तरुण आहेस. एकाद्या तरुणाच्या जीवनांत तूं नन्दनवन निर्माण करूं शकशील. फार उत्तम प्रकारें करशील तें काम! माझ्याशीं लग्न करून तुला जितकें सुख मिळालें असतें त्याहून कितीतरी पटीनें जास्त सुख तुला या मार्गानें मिळेल. आपणांला एकमेकांपासून जितका आनंद मिळाला आहे त्यापेक्षां कितीतरी जास्त आनंद तुला अशा पद्धतीनें वागून मिळेल."

तिच्या तोंडून एक शब्दहि बाहेर पडला नाहीं. प्रणयाच्या धुंदींत तिनें त्याचें डोकें आपल्या छातीशीं घट्ट आवळून धरलें आणि ती मूक अश्रुपात करूं लागली.

"शांत व सुव्यवस्थित जीवन जगण्यासाठीं तुझा जन्म आहे! आपण एकमेकांवर कितीहि प्रेम करीत असलों तरी तुझ्या जीवनाचा खरा वाटेकरी दुसराच कोणीतरी आहे. समज मी मारला गेलों तर?"

"अग बाई ग! काय अभद्र कल्पना ही! पण सध्यां तरी तुम्ही जिवंत आहांत ना?"

"तर मग मी आतांच मरतो!"

तो उठला आणि धांवत जाऊन त्यानें सरोवरांत उडी टाकली. घाबरीघुबरी होऊन तीही त्याच्या मागोमाग पाण्यांत पडली. पाण्यांत तिनें त्याला शोधलें आणि अखेर शेवटीं त्याला पकडून......

एकदम तिचे डोळे उघडले. तिनें खूप जोरानें उशीला कवटाळलें होतें. तिचे सार्टीनचे कपडे घामानें भिजून चिंब झाले होते. तिचें अंग एकदम शहारलें.

कुणी ऐकत तर नाहीं ना? कुणी पहात तर नाहीं ना?—या आशंकतेनें तिनें भीतभीत सभोंवार नजर टाकली. तेथें कुणीच नव्हतें. तरी पण तिला असा भास झाला कीं कुणीतरी ओरडून सांगत आहे, "मला माहीत आहे! मला माहीत आहे!!"

निराशेच्या अथांग सागरांत आपलें हृदय बुडत आहे असा तिला क्षण-भर भास झाला. थोड्या वेळानें जरा शांतपणें ती विचार करूं लागली, "तो वहिनीचा आवाज मुळींच नव्हता, मिस् चिनचे तरवारीसारखे तीक्ष्ण शब्दहि ते नव्हते...अरे, हें काय? पुन्हां ऐकूं येऊं लागला तो आवाज. 'हुवान हियो चिहनें सगळं कबूल केलंय!' अग्गोऽबाई! छे:! ही तर रात-किड्यांची किरकिर आहे. वाऱ्याच्या झुळकीबरोबर आंत येती आहे झालं!"

खिडकीशीं बसून ती नुकत्याच पडलेल्या स्वप्नाचा विचार करूं लागली. हा कांहीं अपशकून तर नसेल ना? अशी तिला भीति वाटूं लागली. त्याच्या पत्रांत असलेल्या गोष्टीसंबंधींच ती बोलली होती. त्यांत रहस्य असें काय होतें? तरी पण त्याचे मुद्दे अगदींच मामुली व पोचट आहेत असें तिला वाटूं लागलें.

"ही इतकी साधीसुधी गोष्ट आहे कां? मी आतां पुष्कळ बदलून गेलें आहे. पूर्वींची मी आतां उरलेली नाहीं. एका सुंदर आरशाचा चक्काचूर झालेला असा मी एक तुकडा आहे. या सगळ्या गोष्टी सहजासहजीं नाकारतां येण्यासारख्या आहेत काय? वा सहजासहजीं विसरणें शक्य आहे काय? ठीक आहे! मी पूर्वींचीच आहे. अगदीं छान तब्येत आहे माझी. मला कसलाहि कलंक लागलेला नाहीं. मी कोणत्याहि प्रकारें मलीन झालेली नाहीं. जो माझें प्रेम प्राप्त करील त्याला त्या मोबदल्यांत आपलें कौमार्य, आपलें पवित्र शरीर व त्याची सर्व सुखें मी मोठ्या आनंदानें अर्पण करीन."

"होय, हेंच खरें! कां असूं नये असें? मी जरी त्याला विसरूं शकत नसलें तरी इतरांना या गोष्टी माहीत असण्याचें काय कारण? 'हें रहस्य मी आपल्या स्वत: बरोबर स्वर्गात घेऊन जाईन. दुसऱ्या कुणालाहि याचा पत्ता लागूं देणार नाहीं.' असें त्यानें वचन दिलें आहे. जर हें खरें असेल तर मी देखील आपल्या हृदयांत हें रहस्य गाडून टाकीन. मग आम्हां दोघां

व्यतिरिक्त इतर कुणालाहि हें रहस्य कळणार नाहीं. या कानाची बातमी त्या कानाला समजणार नाहीं. ”

हुवान हियो चिहच्या डोळ्यांना जीवन पुनः सुंदर व सुखदायक दिसूं लागले आणि तिच्या कल्पनाशक्तीनें तिच्या समोर आशेचा एक भव्य महाल उभा केला. आतां ती जगासाठीं आपल्या जीवनरूपी घराचे दरवाजे सताड उघडें ठेवणार आहे. जगाच्या स्वागतासाठीं ती आपले बाहू पसरणार आहे जगासाठीं...पण ‘लोकां’च्या बाबतींत माणूस निश्चित होऊं शकत नाहीं ही किती विचित्र गोष्ट आहे !

तूं अगदीं निश्चितपणें जीवन व्यतीत करूं शकशील का ? ” तिच्या हृदयानें विचारलें.

आणि तिला कबूल करावें लागलें कीं, “नाहीं !”

‘ लोक ! ’—लोक काय म्हणतील ! छिद्रान्वेषी, निर्दय लोक इतरांच्या खाजगी भानगडीचा तलास लावण्यासाठीं काय काय उठाठेवी करीत असतात.

तिच्या मनश्चक्षूसमोरून एकामागून एक ‘लोक’ तरंगत तरंगत जाऊं लागले. तिनें दांत ओठ खाल्ले. दोन्ही हातांनीं डोकें घट्ट पकडून धरलें आणि पुनः पुनः म्हणूं लागली. “ जग वाईट नाहीं; या जगांत राहण्याचा मला अजूनाहि हक्क आहे. मजपासून तो हक्क हिरावून घेण्याची कुणाचीहि छाती नाहीं. माझ्या सुखाची राखरांगोळी करण्याइतका बदमाप या जगांत कोण आहे?”

पण ‘ लोक ’ किती हलकट असतात ! तिच्या ठिकाणीं जर दैवी शक्ति असती तर तिनें एकादी रोगराई उत्पन्न करून या ‘ लोकां ’ चा संपूर्ण नायनाट करून टाकला असता !

जेवण झाल्यावर तिची भावजय म्हणाली, “ वन्सं, सिनेमाला चलता कां आज ? नवीन पिक्चर लागलंय! माचिन हुवाची एक शोकांतिका आहे. याल ना ?”

ती तरुण भावजय त्या चित्रपटाचें कथानक सांगू लागली. तिचा प्रत्येक शब्द हुवान हियो चिहच्या हृदयांत भाल्याप्रमाणें जाऊन घुसत होता. ती आपलीच थट्टा तर करीत नाहीं ना? या भीतीनें हुवाननें हळूच मान उचलून तिच्याकडे पाहिलें. पण तिच्या चेहऱ्यावरील भाव अगदींच निरागस होते. हुवानचा जीव भांड्यांत पडला. पण तिच्या भावानें जेव्हां त्या बोलपटाची

समालोचना करायला सुरवात केली तेव्हां आपल्या मेंदूवर कुणीतरी घणाचे घाव घालीत असल्याचा तिला भास झाला. तो म्हणत होता.

"असल्या या गोष्टींविषयीं माझे आपलें असें मत आहे कीं नाटयगुणाच्या दृष्टीनें या अगदीं टाकाऊ असतात. माचिन हुवाच्या शोकान्तिकेसारख्या घटना तर व्यवहारांत पदोपदीं दृष्टिस पडतच असतात. त्यांत वैशिष्ट्य असें काय असतें ? आतां या घटना सर्वांनाच माहित नसतात; यामुळें लोकांना त्यांत गंमत वाटते एवढेंच ! पण खरें पाहिलें असतां वास्तविक घटनांमध्यें तरुणी आत्महत्त्या कधींच करीत नाहींत."

हुवान हियो चिहच्या डोळ्यांपुढें काजवे चमकूं लागले. ती निश्चलपणें व निःस्तब्धपणें बसून राहिली. सर्व खोलभिर धूर भरला आहे व त्यामुळें आपला जीव कासावीस होत आहे असा तिला भास होऊं लागला. तिच्या भावानें तिच्याकडे लक्ष देऊन पाहिलें नाहीं म्हणून बरें; नाहींतर ती तिथल्या तिथेंच मूर्च्छित होऊन पडली असती.

"मोठ्या पराकाष्ठेनें मनावर ताबा ठेवीत ती आपल्या भावजयीला म्हणाली, "तुझी इच्छाच आहे तर येते बापडी मी तुझ्याबरोबर !"

सगळे लोक जेवणासाठीं टेबलाभोंवतीं गोळा झाले होते. कोणी कांहींच बोललें नाहीं. हुवान हियो चिहच्या चेहऱ्यावरील विषादाची छटा दूर झाली व ती पुन्हां सर्वांबरोबर सगळ्या कार्यक्रमाला हजर राहूं लागली हें पाहून सर्वांना आनंद झाला. तिचा भाऊ जणुं आभार मानण्याच्या मनिषेनें तिच्याकडे पाहून किंचित् हंसला. तिच्या भावजयीनेंहि मंदस्मित केलें. आपण टाकलेला डाव इतका यशस्वी झाला हें पाहून हुवानला मोठी गंमत वाटली. या सगळ्यावरून निदान एवढेंतरी स्पष्ट झालें कीं घरच्या माणसांपैकीं कुणाच्याहि मनांत तिच्याविषयीं तिळमात्रहि संशय नव्हता.

सिनेमाच्या थिएटरांत पुष्कळ ओळखीचे लोक भेटले. हुवाननें सर्वांच्या चेहऱ्याकडे अगदीं निरखून पाहिलें. सगळेजण अगदीं अनभिज्ञ दिसत होते. तिच्याकडे कुणीच कठोर नजरेनें पहात नव्हते. आणि त्यांच्या बोलण्यांत तिला लागण्यासारख्या खांचाखोंचाहि नव्हत्या.

"या रहस्याची माहिती कुणालाहि कळलेली नाहीं, यांत कांहीं शंका नाहीं." ती मनाशीं म्हणाली. सिनेमाच्या पडद्यावर प्रियकर व प्रेमिका यांना

पाहून तिचें मन जास्तच प्रसन्न झालें. आपल्या प्रियकराच्या वचनांविषयीं तिची अधिकाधिक खात्री होत गेली. "त्या दोन अल्पकालीन गांठीभेटींची कुणाला गंधवार्ताहि दिसत नाहीं." ती स्वतःशीं पुटपुटली.

पण तिच्या हालचाली मा चिन हुआच्या नायिकेच्या हालचालीपेक्षां पुष्कळच वेगळ्या होत्या.गेले दोन आठवडे तिचा जीव अगदीं घाबरा घाबरा होत असे. त्यावरून एकाद्याला सगळ्या गोष्टी सहज कळून चुकल्या असत्या. त्यामुळें लोकांना संशय आला असता व आश्चर्यहि वाटलें असतें. आपल्या या वागणुकीबद्दल लोकांना आतां कांहीं ना कांहीं सबबी या सांगाव्याच लागतील, असा एक विचार तिच्या डोक्यांत उद्भवला. मग आतां आपण काय सांगायचं ?–असा प्रश्न तिच्यासमोर उभा राहिला. उन्हाळ्याच्या सुरवातीस ऋतूंत बदल झाल्यामुळें तब्येत बिघडली होती, असें तिला सांगतां आलें असतें. आपण लोकांना जितकें तिरस्करणीय समजत होतों तितके ते नाहींत असें तिला वाटूं लागलें. तिनें अगदीं राईचा पर्वत करून टाकला होता. जीवनांत तिला आतां आशेचा किरण दिसूं लागला. आणि आजपर्यंत न दिसलेली अशी एक अवर्णनीय प्रसन्नताहि तिला दूर क्षितिजाजळ दिसूं लागली.

पण तिला तर खरोखरीच "उन्हाळा बाधला!"—ती फार लवकर थकून जाई. सर्व दिवसभर पडून राहण्याची इच्छा होई. मन आंतून अगदीं कंटाळून जाई. भूक खूप लागे पण तोंडापर्यंत घास नेतांच ती कुठल्या कुठं पळून जाई व तिला मळमळूं लागे. एक आठवड्यानंतर एक नवीनच रहस्यस्फोट झाला. उन्हाळ्याच्या त्या रखरखीत दिवसांत या खेपेची 'पाळी' चुकली ! अशा गोष्टी खरोखरच घडतात का ? मग हें सगळें खरेंच तर ?

होय ! खरी परिस्थिति अशीच होती. तिनें कल्पनेनें बांधलेला हवेंतील मनोरा धाडकन् कोसळला. तिनें इतक्या प्रेमानें ज्या आशा उराशीं बाळगल्या होत्या त्या नेस्तनाबूत झाल्या.

आतां ती रात्रंदिवस तडफडूं लागली. रात्री व दिवस इतक्या झपाट्यानें जाऊं लागले कीं जणूं गुराखी त्यांना गुरांप्रमाणें तडाखे मारीत हांकतच असावा. आतां आपण आपल्या चितेकडे वेगानें धांवत आहोंत याची तिला कल्पना येऊन चुकली. तिला कांहीं सुचेनासें झालें. कुणाची मदत नाहीं,

कुणीं सहानूभुति दाखविणारें नाहीं.–तिला एकाएकी आपल्या मृत मातेची आठवण झाली. आपली आई असती तर किती बरें झालें असतें असें तिला वाटूं लागलें. मग ती कितीहि रागीट असती तरी हरकत नव्हती. पण तिला तर आपल्या आईचा चेहराहि आठवत नव्हता. जगांत आपलें असें कोणी कोणी नाहीं, असें तिला वाटूं लागलें. तिची मावशी फार चांगली स्त्री होती. पण ती एक अत्यंत कनवाळू अशी पालक होती. हो नुसती पालकच ! तिचा भाऊ हा मावसभाऊ होता. जोंपर्यंत त्याचें लग्न झालें नव्हतें तोंपर्यंत तीं दोघें कशीं अगदीं खेळीमेळीनें रहात होतीं. पण आतां त्याची बायको घरांत आल्यापासून तीं दोघं एकमेकांशीं कधीं मनमोकळेपणानें बोललेसुद्धां नव्हतीं.

रात्रींच्या वेळीं खिडकीशीं बसून ती अन्यमनस्कपणें अनंत आकाशांतील अगणित ताऱ्यांकडे पाहूं लागली. तिचें मन समोरील डोंगरटेकड्यांवरून भटक्या मारीत होतें. त्या अर्धवट प्रकाशांत तिला पुन्हां ‘त्याचा’ चेहरा दिसला; तो विचारीत होता, “असं कसं झालं ? एवढ्या थोड्या अवधीच्या भेटींत असं कसं होऊं शकलं ? मी तुला म्हणालों होतों कीं तूं मला विसरून जा. पण आतां तें अगदीं अशक्य आहे. या जन्मूं घातलेल्या चिमण्या जीवाला तूं आपणां दोघांच्या अमर प्रेमाचें स्मृतिचिन्ह होऊं द्यावेंस अशी माझी प्रार्थना आहे.”—हा तिच्याच हृदयांतील भावनांचा प्रतिध्वनि होता. सगळें वातावरण या प्रतिध्वनीनें दुमदुमून टाकलें. लुकलुकणाऱ्या हजारों तारकाहि डोळे मिचकावीत तिच्या कानाशीं जणूं हेंच सांगत होत्या.

तिनें मनाला धीर दिला. हाच एक मार्ग आतां उरला होता. ती आपलें गुपित आतां लपवून ठेवणार नाहीं. अगदीं छातीठोकपणें ती सगळ्या जगाला ही गोष्ट गर्जून सांगणार ! आपल्या तान्हुल्याला घेऊन अगदीं निर्भयपणें ती जगापुढें उभी राहणार !

“पण खरोखरी हा वेडेपणाच नाहीं का ? निष्ठुर जग तुझें म्हणणें सरळ-पणें ऐकून घेईल असें तुला तरी वाटतें का ? लोक तुला क्षमा करतील अशी खरोखरीच तुझी खात्री आहे का ? तुझ्याबरोबर दुसरा कुणीतरी असता तर गोष्ट वेगळी. कारण समाजाचा असा नियम आहे कीं प्रत्येक मुलाला बाप हा असलाच पाहिजे—मग तो नांवापुरतां कां असेना ? तुला जर जगांत

सुखासमाधानानें रहावयाचें असेल तर तुला एकादा जोडीदार शोधून काढलाच पाहिजे !"

विचार करतां करतां तिचा मेंदू अगदीं शिणून गेला. यांतून मार्ग कसा काढावयाचा ? चांदण्या व चंद्र यांच्यामध्यें तिचें मन हेलकावे खावूं लागले. दोन मार्गामध्यें ती भटकत होती. अगदीं थकून गेली होती ती. तिची दु:खाची भावनाच जणूं बधिर झाली होती. हंसण्याप्रमाणें रडणेंहि जणुं ती विसरून गेली होती. तिच्या अंतःकरणांत कसल्याच प्रकारची भावना उरली नसावी असें वाटत होतें.

ती दिवसेंदिवस वाळत चालली होती. आपलें रहस्य लपविणें आतां तिला अधिकाधिक अवघड वाटूं लागलें. तिच्या आजाराची तिच्या मावशीला फार काळजी वाटूं लागली. एके दिवशीं खुरडत खुरडत ती हुवानच्या खोलींत आली आणि अर्धा तासपर्यंत पुनः पुनः हेंच म्हणत राहिली :

" किती वाळत चालली आहेस बाळ हुवान ! तुला काय होतंय तें तरी सांग ना ? एवढा कसला विचार करीत असतेस सारखी ? नीट जेवत सुद्धां नाहींस. फारच अशक्त दिसूं लागली आहेस. तुला जर कांहीं हवें असेल तर तसें मला सांग म्हणजे मी करतें त्याची व्यवस्था ! तुला कुणी टाकून तर बोललें नाहीं ना ? तुझी वहिनी कांहीं बोलली कां तुला ? मला सुद्धां नाहीं कां सांगणार तूं सगळें मनमोकळेपणानें ? माझ्या बहिणीची तूंच तर एकुलती एक मुलगी आहेस. तुला जर कांहीं त्रास झाला तर देवाघरीं मी तिला कसें बरें तोंड दाखवूं ? "

म्हाताऱ्या मावशीचे डोळे भरून आले. हुवाननें आपले अश्रु कसेबसे आंवरून धरले. ती कृत्रिमपणें हंसली पण कांहीं बोलली नाहीं. तिनें नुसतें डोकें हलविलें. तिला किती वाटत होतें कीं मावशीच्या गळ्यांत गळा घालून मनमुराद रडून घ्यावें आणि तिला म्हणावें, " मावशी, तुला तुझ्या कर्तव्याची जाणीव आहे म्हणूनच तूं मजवर प्रेम करतेस. पण काय ग मावशी, जेव्हां तुला माझी खरी परिस्थिति कळून येईल तेव्हांहि तूं मजवर इतक्याच उत्कटतेनें प्रेम करशील कां ? सांग बरें ? "...पण विस्फारित नेत्रांनीं—मावशीकडे पहात ती एवढेंच म्हणूं शकली, "खरंच, मावशी मला खरोखरीच

कांहीं होत नाहीं. या उकाड्यामुळं जीव गुदमरल्यासारखा होतोय झालं. मला कुठल्याहि प्रकारची काळजी किंवा मानसिक क्लेश नाहींत ! ”

आपली मावशी स्वतःच्या बहिणीविषयींच्या कर्तव्यामुळें आपल्यावर प्रेम करते याची हुवानला कल्पना होती. तिचा भाऊ आपल्या आईमुळें तिच्याशीं आपलेपणानें वागत होता व तिची वहिनी तिच्या भावामुळें तिच्याशीं सरळपणें वागत होती. म्हणजे प्रत्येकाच्या प्रेमाचें कांहीं ना कांहीं कारण होतें. केवळ तिच्यावरील प्रेमासाठीं तिला जवळ करणारे असें कोणचि नव्हतें. फक्त एका माणसानें तिला ओळखलें होतें; तिच्यासाठींच तिच्यावर प्रेम केलें होतें. पण तो तिला सोडून निघून गेला. तिच्या नशिबांत तिच्या स्वतःच्या हातूनच तिचें मरण ओढवेल असें लिहून ठेवलें असेल कां ? जर असेंच असेल तर ‘ त्याच्या ’च हातून आपल्याला मरण यावें असें तिला वाटूं लागलें. समजा, एखादा पुरुष आता खरोखरींच तिच्यावर प्रेम करूं लागला, तरी त्यानें काय होणार ? तिला मरावें हें लागणारच ना ? हें भयानक सत्य त्याला सांगणें तिला भाग पडेल आणि मग ती त्याच्या क्रोधाला बळी पडेल.

तिच्या वहिनीनें तिला तिच्या उदासीनतेचें कारण विचारलें. ती म्हणाली, “ किती रोडावलांत तुम्ही वन्सं ! कुणी कांहीं बोललें तर नाहीं ना तुम्हांला ? माझ्याकडून कांहीं चुकी तर नाहीं ना झाली ? तसं असेल तर मला खरोखरी फार वाईट वाटेल. खरं खरं सांगा ! अगदीं संकोच न करतां बोला ! ”

तिच्या या बोलण्यानें हुवान जास्तच घाबरली. तिला अगदीं गुदमरल्यासारखें झालें. आपल्या वागणुकीमुळें इतरांना नसती काळजी लागून राहिली आहे याचें तिला दुःख झालें. आपल्या भेदरट व असंबद्ध वागणुकीमुळें घरच्या लोकांना आपला संशय येऊं लागला आहे, चोहोंकडून चौकस नजरा आपल्याकडे पहात आहेत असा तिला भास होऊं लागला. खोलींतील एकान्तहि आतां तिच्या नशिबीं राहिला नाहीं. कारण दरवाजाच्या बाहेर तिला कसले तरी आवाज ऐकूं येऊं लागले.

“ किती भयंकर आवाज आहेत हे ! मृत्यूच्या पावलांची चाहूल तर नव्हे ही ? पण मी अशी मरणार नाहीं. मी तरुण आहे. अजून माझें कितीतरी आयुष्य बाकीच आहे. फक्त एका ‘प्याल्या’ ची इतकी भयंकर किंमत द्यावी लागणार का ? ”

पण त्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. दुसरा मार्गच नव्हता मुळीं—तिला आतां या जगांत स्थानच उरलें नव्हतें.

ती विचार करूं लागली, "समजा, मी अगदीं छातीठोकपणें आपल्या या रहस्याचा स्फोट केला आणि मजवर होणाऱ्या निंदेच्या वर्षावाकडे एक तुच्छता-दर्शक नजर टाकली; तर काय होईल ?"

पण ही कल्पना डोक्यांत येतांच तिचे हातपाय गळाले. आत्मबलिदान करण्यासाठीं एक क्षणभर कां होईना, प्रेमाची अनन्त मस्ती अंगीं असायला पाहिजे. जगाच्या उपहासाचे वार झेलण्यासाठीं मन आणि इच्छाशक्ति ही भरभक्कम असावीं लागतात. या गोष्टींची तिच्या ठिकाणीं उणीव होती. आपलें ओझें कमी व्हावें म्हणून तिनें एकादा जोडीदार शोधून काढला तरी त्याचें नातें फार वेळ टिकणारें नाहीं. शिवाय अशा प्रकारें कसेंबसें लग्न उरकून घ्यावें लागणें हीच तिची अयशस्विता नव्हती काय ? आणि झटपट उरकलेल्या या लग्नामुळें जन्मभर आपल्या नशिबीं कसला जोडीदार येईल हें कोणा सांगूं शकेल ?

तिला आपल्या बरोबरीच्या कितीतरी मुली आठवल्या. प्रत्येकीचे कितीतरी प्रियकर होते. त्यांनीं असल्या या अडचणींना कसें बरें तोंड दिलें असेल ? ज्यांना आपण आपल्याशीं लग्न करण्यास भाग पाडूं अशीं ज्यांच्या-बद्दल त्यांना खात्री होती त्यांच्याशींच त्यांनीं संबंध वाढविले असतील का ? कीं ज्यांनीं आपणहून लग्नाची इच्छा प्रदर्शित केली त्यांच्याशींच त्यांनीं संबंध ठेवले ? किती निरागस, किती निष्पाप, किती एकनिष्ठ, किती उदार हृदयाची व किती मूर्ख होती हुवान ! या जगांत राहाण्याचा तिला हक्कच नव्हता जणुं !

शू पाव पॅगोडाच्या पलीकडे एक छोटसा तारा चकाकूं लागला. आणखी एका रात्रीनें जगाला आपल्या पदराखालीं झांकून घेतलें. हुवानचा मेंदू जोरजोरांत काम करूं लागला. तिचे विचार विजेच्या गतीनें धावत होते. तिच्या तेवीस वर्षांच्या आयुष्यांत ज्या कांहीं महत्वाच्या गोष्टी घडल्या होत्या त्या ती आठवूं लागली. आपल्या वयाच्या सतराव्या वर्षीं सबंध चीनभर एका अभूतपूर्व स्वातंत्र्याची लाट कशी उसळली होती व त्यांत आपण कसा

हिरीरीनें भाग घेतला होता याची जेव्हां तिला आठवण झाली तेव्हां ती क्षणभर आपलें सगळें दुःख विसरली.

ज्या प्रकाश किरणानें तिचें सारें जीवन व्यापून टाकलें होतें तो किरण तिला आठवला. तिनें आपल्या मावशीला व वहिनीला मोठ्या दिमाखानें सांगितलें होतें कीं 'माझा जीवन सहचर मी स्वतःच पसंत करणार आहे !'

सगळें जग संकुचित होत होत अगदीं तिच्याजवळ आलें. आपल्या सभोंवारची प्रत्येक वस्तु कडाकड मोडून पडत आहे, कांहींहि आवाज न होतां भयंकर वेगानें जगाचे तुकडे तुकडे होत आहेत असें तिला वाटूं लागलें.

तिनें आपल्या थरथरणाऱ्या हातांत एक लांब रेशमी दोरी घेतली. तिच्या साऱ्या शरीरांतून जोरजोरां आरोळ्या उठत होत्या,—"कपटी ! दगाबाज ! हरामखोर !—प्रत्येक गोष्ट असत्य आहे, झूट आहे—स्वातंत्र्य ! प्रगति, नवमतवाद—सब झूट आहे !"

तिच्या मनांत विचार आला, "मोठ्या माणसांनीं ठरवून दिल्याप्रमाणें आपण जुन्या पद्धतीनें लग्न करून मोकळे झालों असतों तर किती बरें झालें असतें! निदान अशा प्रकारच्या मानसिक यातना तरी भोगाव्या लागल्या नसत्या आणि जीवनाचा असा खेळखंडोबा—असा शोकपूर्ण शेवटहि झाला नसता! वहिनीप्रमाणें मीहि एखाद्या पुरुषाच्या जीवनाशीं समरस होऊन गेलें असतें."

ती आपल्या पलंगाच्या कांठावर उभी राहिली. दुःखानें तिचें सगळें शरीर थरथर कांपत होतें. तिच्या डोळ्यांत अश्रूंऐवजीं रक्तच भरलें आहे असा भास होत होता. तिचा मेंदू मुळींच काम करीत नव्हता. होतां होईल तितक्या लवकर या सगळ्या यातनांचा शेवट करावयाचा एवढेंच तिला माहीत होतें. 'स्वातंत्र्य, समता व नवमतवाद' यांचा बुडबुडा फोडण्याचें पाप आपल्या माथीं लादलें जाऊं नये यासाठींच तिची सगळी धडपड होती. तिनें दृढचित्तानें ती दोरी तुळईला बांधली, दुसऱ्या टोकाचा गळफास बनविला आणि जरा वांकून त्यांत आपली मान अडकविली; व ती दोरीला लोंबकळूं लागली.

अगदीं याच वेळीं तिच्या भ्रमिष्ट मेंदूच्या अंधारांत कुठें तरी एक अस्पष्ट विचार वर येण्याचा प्रयत्न करूं लागला.

"अजूनहि एक मार्ग आहे. समाजांत क्रांति घडवून आणण्यासाठी जी तुफानी

चळवळ सुरूं झाली आहे त्यांत जर तूं धडाडीनें भाग घेशील—जर तूं धडाडीनें भाग घेशील—जर तूं पुढें होशील...जर तूं समाजाच्या प्रयत्नाला हातभार—"

पण रेशमाची ती गुळगुळीत दोरी तिच्या लुसलुशीत गळ्यांत रुतून बसली आणि तिचा हा 'विचार' अर्धवटच राहिला.—

★

# नजराणा

: : मूळ लेखक : तिंग लिंग

"आई ! जरा खालीं स्वयंपाक घरांत जा पाहूं !"

लाकडी जिना चढून खोलीच्या दरवाजांतून आंत शिरतां शिरतां आह फू आपल्या आईला म्हणाला. त्याच्यामागून एक तरुण आंत येत होता. यापूर्वी हा कितीतरी वेळां या घरीं आला होता. तोच हा. त्याच्या काखेंत एक लहानसा पिवळा कोट होता.

ती एका लहानशा खिडकीमागें जाऊन बसली होती. या खिडकीला एकाच फळीचें दार होतें. तें उघडलें कीं खोलींत प्रकाशाचा भला मोठा झोत शिरत असे. त्या प्रकाशांत बसून ती आपल्या नातवाच्या पायजम्यानां ठिगळे लावीत असे.

ते दोघे आंत गेले. आह फूनें आपल्या आईकडे न पाहतां अंगांतलि कोट काढला. तो खाटल्यावर बसला आणि आपल्या मित्राला म्हणाला, 'बैस ना!"

म्हातारीच्या ध्यानांत आलें कीं पुन्हा तीच भानगड आहे. जेव्हांपासून ही भानगड सुरूं झाली होती तेव्हांपासून तिला कळून चुकलें होतें कीं तिचा

मुलगा आतां एका अशा दुनियेंत दाखल झाला आहे कीं जिचा थांगपत्ता तिला लागणें शक्य नाहीं. या नव्या दुनियेच्या उंबरठ्यावर उभा राहून आह फू तिच्याकडे—आपल्या आईकडे—पहात होता. त्या विचित्र परिस्थितीमुळें ती दु:खी झाल्याशिवाय कशी राहील? कांहींहि असो यावेळीं मात्र तिनें चिंध्यांचें गाठोडें बांधलें आणि त्या पाहुण्याकडे तिरप्या नजरेनें पहात तेथून निघून गेली.

तरीपण ती कांहीं स्वयंपाकघरांत गेली नाहीं. जवळच्या एका लहानशा दारांतून ती शेजारच्या खोलींत गेली. ही खोली इतकी लहान होती कीं तेथें फक्त एकच माणूस पाय पसरून झोपूं शकला असता. दिवसा देखील त्या खोलींत दाट काळोख असे. ज्या खोलींत तिचा मुलगा बसला होता ती खोली व ही खोली यांमध्यें एक बांबूचा कूड होता. यामुळें तिच्या मुलाच्या तोंडून निघणारा शब्दन् शब्द तिला स्पष्ट ऐकूं येत होता.

जेव्हां त्यांनीं गंभीरपणानें बोलायला सुरवात केली तेव्हां ती म्हातारी अगदीं चूप झाली. त्यांचा प्रत्येक शब्द ऐकूं यावा म्हणून तिनें आपला श्वासोच्छ्वासहि मंद केला. आणि कुडाला कान लावून ती ऐकूं लागली.

संध्याकाळची वेळ होती. त्या बंद गल्लींत कितीतरी बिऱ्हाडें रहात होतीं; कांहींजण आपल्या अंगाला तेल लावीत होते, कांहींजण एकमेकांस मालिश करीत होते, आणि पुष्कळसे उघडेबोडके लोक लहान लहान तिपायांवर बसून आपल्या हातांतलि मोडक्या तोडक्या पंख्यांनीं शरीरावर बसणारे डांस उडवीत होते. ते लोक भयंकर बडबड करीत होते; हंसत खिदळत होते; एकमेकांची थट्टामस्करी करीत होते आणि ज्यांचा अर्थ मजुरांनाच समजेल अशी ग्राम्य गीतें म्हणत होते. केव्हां केव्हां तर हा कोलाहल इतका भयंकर वाढे कीं त्या म्हातारलि आपल्या मुलाचें बोलणें नीट ऐकूं येईनासें होई. तरीहि कुडाला कान लावून ती मोठ्या ध्यानपूर्वक प्रत्येक गोष्ट ऐकत होती.

अंधार पडला. प्रत्येक घरांत स्वयंपाक तयार होऊं लागला. छपरांमधून धुराचे ढग निघून ते वरवर जाऊं लागले. थोड्याच वेळांत सगळी गल्ली धुरानें भरून गेली, आणि मग रिकामीहि होऊं लागली. परंतु जेथें ही म्हातारी बसली होती तेथून धुरास बाहेर जाण्यास कांहींच मार्ग नसल्यामुळें तो तेथेंच कोंडला गेला; व त्यामुळें तिचा जीव कासावीस होऊं लागला. इतक्यांत तिला खोकल्याची ढांस लागली. "खो: खो: खूं: खूं: आह: ख:!"

"तुझी आई आजारी आहे कां रे? किती जोराची उबळ आलीय!"

तेव्हां कुठें आह फूच्या ध्यानांत आलें कीं आपली आई येथेंच आहे! तो ओरडून म्हणाला. "आई, अग आई! बाहेर ये पाहूं त्या खोलींतून! किती भयंकर उकडत असतं तिथें! पण तूं मुळीं जातेस कशाला त्या खोलींत?"

तिनें भराभरा आपल्या जवळच्या चिंध्यांचा बोळा करून आपल्या तोंडांत कोंबला आणि गुपचूप बसून राहिली. आपण त्यांची बोलणीं ऐकत आहोंत असें जर त्यांना कळलें तर तें त्यांना आवडणार नाहीं हें ती समजून होती. तिच्या डोळ्यांतून व नाकांतून पाण्याच्या धारा सुरूं झाल्या. तरीपण तेथें बसून त्या दोघांचें बोलणें ऐकण्याचा तिचा निश्चय कांहीं डळमळला नाहीं. तिच्या सुनेनें व नातवानें तिला जेवावयासाठीं खालून हांक मारली तरीहि ती तेथून हलली नाहीं कीं बोलली नाहीं; डासांच्या फौजा तिच्यावर हल्ल्यामागून हल्ले चढवीत होत्या. ती हातांच्या फटकाऱ्यांनीं त्यांचा प्रतिकार करीत होती. पण ते जातां जातां देखील तिच्या सुकलेल्या, हडकुळ्या व दुबळ्या अशा हातांना इतक्या जोरांत व कडकडून चावे घेत कीं मोठमोठ्या गांधी उठत.

अखेर तो पाहुणा एकदांचा उठला आणि निघून गेला. आह फू स्वयंपाक घरांत जाऊन खाण्यासाठीं कांहीं शिळेंपाकें उरलें आहे कीं नाहीं हें पाहूं लागला. तेव्हां कुठें ती म्हातारी त्या अरुंद नि कोंदट खुराड्यांतून बाहेर पडून घरांतील इतर मंडळींत मिसळली.

"हें काय? तुमची तब्येत ठीक नाहीं कीं काय? तिच्या सुनेनें तिच्याकडे पहात विचारलें. ती मागील दरवाजांत आह फू जवळ बसून आपल्या लहान मुलाला स्तनपान करवीत होती.

"तुझें आपलें कांहींतरीच! मला गं काय होतंय?" तिच्या चेहऱ्यावरील सुरकुत्यांमधून आनंद आणि विश्वास दृग्गोचर होत होता, व हा आनंद आणि विश्वास तिच्या शब्दांतून बाहेर पडत होता. परंतु तिच्या मुलाच्या किंवा सुनेच्या लक्षांत तें आलें नाहीं.

— २ —

सून आणि मुलगा कारखान्यांत कामास निघून गेले होते. लहान मुलगा गल्लींतील इतर मुलांबरोबर खेळण्यांत रमून गेला होता.

म्हातारी एक अत्यंत जीर्ण झालेला, फाटका तुटका कोट शिवत बसली होती. हा कोट वरच्या मजल्यावर रहाणाऱ्या इह ता फू नांवाच्या माणसाचा होता. इहची बायकोहि कारखान्यांत कामाला जाई. दुपारीं व संध्याकाळीं जी थोडीशी सुट्टी मिळे, तेवढ्या वेळांत ती घरचें स्वयंपाक-पाणी करी, भांडींकुंडीं घाशी आणि कपडेलत्ते धुई. अशा स्थितींत जुने कपडे दुरुस्त करायला बिचारीला वेळ तरी कोठून मिळणार ?

काम करतां करतां म्हातारी बेचैन होऊन एकदम दचकत असे. तिला कोणाशीं तरी बोलावयाचें होतें. पण बोलणार कोणाशीं ? कुणाजवळ हृदय उघडे करणार ती ? तिचा पोटचा मुलगाच जिथें तिला महत्त्व देत नव्हता तिथें इतर कोण तिला विश्वासांत घेणार ? शिवाय आपल्याला नक्की काय हवें आहे हें तरी तिला कुठें समजत होतें ? किती तरी वेळपर्यंत ती त्या तशा विमनस्क स्थितींत बसून राहिली. आपल्याला कांहींतरी भयंकर क्लेश होत आहेत एवढीच तिला जाणीव होत होती. आणि त्याचाच ती विचार करूं लागली. एकाएकीं मागला पुढला कसलाही विचार न करतां तिनें शेजारी रहात असलेल्या वांगच्या बायकोस हांक मारली.

वांग पो पो लाकडी डोणीवर वांकून कपडे पिळत होती. म्हातारी तिच्याजवळ जाऊन उभी राहिली आणि थोडावेळ स्तब्ध राहून एकदम म्हणाली, " काय गं पो पो, तुला ती मेजवानीची जागा आठवते कां ? अँ ? आठवते ? आपण एकदां जेवायला गेलो होतों ती ? "

" वा, गं वा ! मी कशी विसरेन ती जागा ? प्रत्येकजण स्वयंपाक करायचा नि पोटभर खायचा. ज्याच्याजवळ जे कांहीं असे त्यांत सर्वांचीच वाटणी असे. खरंच. मला त्यावेळीं वाटलें, सर्व लोक जर नेहमींच अशा तऱ्हेनें राहूं लागतील तर किती छान होईल ! "

वांग पो पो काम करतां करतां मध्येंच थांबली आणि तिनें आपले ओले हात लुगड्याला पुंसले. इतक्यांत शेजारच्या लीची बायको तेथें येऊन पोहोंचली. ली ही खूप म्हातारी होती. ती जोरजोरांत सांगूं लागली.

" बरं कां गं ! प्रथम प्रथम तर आमचा त्या गोष्टीवर विश्वासच बसला नाहीं. प्रत्येकजण म्हणे कीं आह सान झूट बोलतोय. इतकेंच काय पण प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनीं पाहिल्यावरहि आमचा विश्वास बसेना. यामुळें त्यांनीं

जोपर्यंत आपण होऊन येऊन आम्हांला आग्रह केला नाहीं तोपर्यंत अन्नाला हात लावण्याची आम्हांला कांहीं हिम्मत झाली नाहीं. तें सगळे इतक्या लवकर आटोपलें याची मोठी हळहळ वाटली आम्हां सर्वांना ! पोलीस आणि जपानी हेर तेथेंहि पोहोंचले मेले ! आणि त्या हलकटांनीं झाडू पासून चुलीपर्यंत एकूण एक वस्तु मोडून तोडून नष्ट करून टाकली ! ”

“ काय ? भाकरी खाणं हाहि गुन्हा आहे काय ? तूंच सांग बरं ! वाट्टोळं होवो मेल्यांचं !”

“ या सर्व कामासाठीं पैसे कुणी दिले होते माहीत आहे तुम्हांला ? “ आहे फूच्या आईनेंच जोर देऊन विचारलें. नसायला काय झालं ? एव्हढी साधी गोष्ट आम्हांला माहीत नसेल ? त्या भल्या सावकारानेंच दिले होते पैसे. बरंचसं नांव होतं बाई त्याचं ! हो लीव त्याचं नांव ! बिचाऱ्याला त्यानंतर लगेच त्या हरामखोर पोलीसांनीं शहराबाहेर हांकून लावलं ! ”

“ काय ? त्याचं नांव लिव होतं ? अस्सं ! त्याच्याजवळ ते पैसे कुठून आले बरें ? एखादा श्रीमंत माणूस अशीं कामें करील असं खरोखरीच वाटतं काय तुम्हाला ? मुळींच नाहीं. असं होणं शक्यच नाहीं. आपल्याकडून त्यानें कांहीं ना कांहीं काम जरूर करवून घेतलें असतें; फुकटा फुकटीं तो एक कवडीहि हातून जाऊं देणार नाहीं. ऐका मी सांगते तुम्हांला खरे म्हणजे हे रुपये दिले होते......” तिनें आवाज हलका करून एकेक शब्द मोठ्या काळजीपूर्वक सांगितला.

“ अग्गोऽबाई ! खरोखरचि असं झालं कां ? ” वांग पो पो नें व लीच्या बायकोनें एकदमच आश्चर्यानें विचारलें.

“ हा कांहीं एका माणसाचा पैसा नव्हता, ” आह फूच्या आईनें समजावून सांगण्यास सुरवात केली, “ एका माणसाचा नव्हे, हजारों, लाखों लोकांचा ! त्या लोकांनीं एक मोठी रकम गोळा केली आणि लढाईच्या ऐन मोक्यावर शांघायला धाडली. या रकमेपैकीं थोडेसे पैसे आपल्याकडे आले. समजलं ? कारण आपण जपान्यांच्या कारखान्यांत संप केला होता; आणि जपानी लुटारू शांघायवर हल्ला चढवीत होते. त्या दिवसांत आपल्याजवळ खायला प्यायला कांहीं नव्हतें म्हणून ते लोक आपल्याला जेऊं खाऊं घालीत होते. ”

" अस्सं ? असं होतं तर एकूण ! असेंच झालें पाहिजे बाई. गरीब लोकच गरीबांना मदत करतात. खरें म्हटलें तर हें आधींच माझ्या लक्षांत यायला पाहिजे होतें. आम्हां लोकांसाठीं फुकटा फुकटी इतका पैसा खर्च करायला लीब कांहीं इतका बेवकूबहि असणार नाहीं, किंवा इतका कनवाळूहि असणें शक्य नाहीं. तें असो. पण तूं असं सांग कीं हें सर्व तुला कळलें कसें ? "

आपल्या मुलानें आपल्याकडे दुर्लक्ष केलें आहे याची आठवण यावेळीं आह फूच्या आईला अजिबात राहिली नाहीं. निदान यावेळीं तरी पुष्कळशा बाबतींत आपलें मत इतर कोणाच्याहि मतापेक्षां अधिक महत्त्वाचें आहे याची तिला खात्री वाटत होती. आणि म्हणून या सर्व गोष्टी ती मोठ्या ऐटींत सांगत होती. " पाहिल्यांदा मला देखील या गोष्टी माहीत नव्हत्या. एकादा मनुष्य भल्या मोठ्या ढोलक्यांत झोपलेला असावा तशी कांहींशीं माझी स्थिती होती. पण हळूं हळूं या गोष्टींविषयीं मला थोडी थोडी माहिती कळूं लागली. नंतर माझ्या असें ऐकण्यांत आलें कीं त्या लोकांना एके ठिकाणीं जय देखील मिळालाय. आपले लोक त्या वीरांचे अभिनन्दन करण्यासाठीं म्हणून त्यांना कांहींतरी भेट पाठविण्याचा विचार करीत आहेत, अशीहि मला नुकतीच बातमी लागली आहे. "

" खरंच ? मग तर फारच छान ! त्यांनीं आपल्याला मदत केली होती तेव्हां आपणहि त्यांना मदत करणें हें आपलें कर्तव्यच आहे.' नाहीं कां ? " म्हातारी ली बाई मध्येंच म्हणाली. जणूं कांहीं आजपर्यंत ती असेंच खरे निष्कर्ष काढीत आली होती.

" पण ते शांघायमध्यें केव्हां प्रवेश करतील कोण जाणे ! " वांगची बायको निश्चित बातमी काढूं इच्छित होती.

" ते नक्की येतील यःबद्दल तूं खात्री बाळग. कधींना कधीं ते आल्याशिवाय राहणार नाहींत. पण किती लवकर ? हें आतां आपल्यावर अवलंबून आहे. जर आपण त्यांना सांगितलें कीं आम्हीं तुम्हांला लवकर पाहूं इच्छितों, जर आपण त्यांना कांहीं नजराणा धाडला, जर आपण त्यांना तार दिली तर ते आणखीन् लवकर येतील. आणि येथें आपल्यावर कसकशीं संकटें कोसळत आहेत हें जर त्यांना कळलें तर ते अगोदर येथेंच येतील, याबद्दल मुळींच संशय बाळगण्याचें कारण नाहीं. " म्हातारीनें वांगच्या बायकोला समजावून

सांगितलें. जणूं या सगळ्या गोष्टी तिला पूर्णपणें माहीत होत्या. ती जें सांगत होती तें तिनें कुणाच्या तोंडून ऐकलें होतें अशांतला भाग नाहीं. पण तिला आपलें वाटत होतें कीं असेंच आहे आणि असेंच होणार. आणि म्हणूनच आपण जें कांहीं सांगत आहोंत तें योग्य आहे व सत्य आहे याबद्दल तिच्या मनांत मुळींच शंका नव्हती."

"आपण त्या लोकांना फूल ना फुलाची पाकळी धाडण्याचा प्रयत्न केला पाहिजे असें मला तरी वाटते." लीची बायको म्हणाली, "वस्तु कशी कां असेना, आपली भावना जर चांगली असेल तर ते आपल्याला कधींच हंसणार नाहींत ! कां ? मी म्हणत्यें तें बरोबर आहे ना ?"

यावर म्हातारी अगदीं खूष होऊन गेली व वांगच्या बायकोनेंहि आपली पसंती दर्शविली. पण कोणती वस्तु विकत घ्यायची ? त्या फारच थोडे पैसे जमवूं शकत होत्या. त्या एवढ्याशा पैशांतून आपल्याला काय खरेदी करतां येईल हा विचार त्यांना भंडावून सोडीत होता. अखेर लीच्या बायकोनें सूचना केली, कीं हें काम सुकर व्हावें म्हणून आपण आणखी कांहीं बायकांना यांत सामील करून घेतलें पाहिजे. ही सूचना सर्वानुमतें मंजूर झाल्यावर त्या म्हाताऱ्या बायांनीं लहान मुलांप्रमाणें हंसत खेळत एकमेकींचा निरोप घेतला. त्यांच्या सुरकुतलेल्या चेहऱ्यांवर एक प्रकारचें बालिश हास्य खेळत होतें आणि त्यांच्या बोळक्यासारख्या तोंडांतून एखादा दुसरा दांत दिसत होता. इतर बायकांना या कामांत सामिल करून घेण्याच्या मोहिमेवर त्या निघाल्या.

— ३ —

आतां त्या सगळ्यांना एक नवीनच काम मिळालें होतें.

तीन म्हाताऱ्या कापड विकत घेण्यासाठीं गेल्या आणि दोघींना दोरा आणण्यास धाडून देण्यांत आलें. पण तीन पैशाला एक गुंडी या भावानें धागा मिळूं शकला नाहीं; म्हणून दोरा आणण्यास गेलेल्या म्हाताऱ्यांनीं आपल्या सुनांकडे कांहीं पैसा मागावयाचें ठरविलें. त्यांतूनहि पुरेसा पैसा न मिळाल्यास आणखी कांहीं बायकांना यांत सामिल करून घ्यावयाचा त्यांनीं बेत केला. आणि म्हणून आपल्या जवळचे पैसे मोठ्या काळजीनें पदराच्या टोकाला बांधून त्या तशाच परतल्या.

कापड विकत घेणाऱ्या बायकांचा कांहीं निश्चयच होईना कीं कसलें कापड

विकत घ्यावें. आणि म्हणून त्या दुकानांदुकानांतून हिंडूं लागल्या. अखेर त्यांना एक कापड दिसलें. हें कापड आपल्या कामाला कांहींसें बरें दिसेल असें त्यांना वाटले आणि त्यांनीं कांहींसें भीतभीतच पैसे मोजण्यांस सुरवात केली. हें काम कांहीं असें तसें नव्हते, आणि त्यांना आपल्या जबाबदारीची पूर्ण जाणीव होती.

जर तें कापड त्यांच्या कामाला योग्य असें निघालें नाहीं तर ती किती नामुष्कीची गोष्ट होईल !

"यानं भागेल आपलं काम ! आतां आणखी जास्त सावधागिरी घ्यावयाचें कांहीं कारण नाहीं. नऊ आणे फूट या भावानें मिळतंय !" कोणीतरी कुजबजली.

त्या बायकांना तें कापड कशासाठीं हवें आहे हें जाणून घेण्याची त्या दुकानदाराची इच्छा होती. परंतु त्यांनीं त्याला मुळींच थांगपत्ता लागूं दिला नाहीं. आणि त्या मनांतल्या मनांत हसूं लागल्या.

"बरं आहे. हेंच ठीक दिसतंय. दोन फूट पुरेल नाहीं ?"

"हो. दोन फूट पुरेसें आहे. आणि आपण त्या नोकराला सांगूं कीं तूं आपल्याकडून जरा जास्तच कापड फाड म्हणून !"

"लूट आहे बाई नुसती लूट ! एक फूट कापडाची किंमत नऊ आणे! अंदाधुंदी नाहींतर काय मेली ! "

तें विकत घेतलेलें कापड त्या अगदीं काळजीपूर्वक लपवून घेऊन चालल्या होत्या. एकाद्या सम्राटाची हिऱ्याची पेटीच होती जणूं ! "

एक डझन—किंबहुना त्याहूनहि जास्त म्हाताऱ्या बाया एके ठिकाणीं बसून विचारविनिमय करूं लागल्या. कामाला सुरवात कशी करायची ? कांहींची अशी कल्पना होती कीं कापडाच्या एका कोंपऱ्यांत कोयता आणि हातोडा काढावा, कारण त्यांनीं इतर बायकांनाहि कोयता व हातोडा काढतांना पाहिलें होतें. शिवाय ती भेट देण्याची वस्तु होती. तेव्हां तेंच चित्र भरणें बरें दिसेल असें त्यांना वाटलें त्यांनीं आणखी थोडे पैसे जमविले आणि त्यांच्यापैकीं कांहींजणी थोडेसें काळें कापड आणावयास गेल्या.

अखेर शेवटीं तें काम संपलें एकदांचें ! कोयता आणि हातोडा जेथें निघावयास हवा होता तेथून जरा अलीकडे सरकला होता; आणि शिवण कामही

विशेष सुंदर झालें नव्हतें. परंतु त्यांच्यापैकीं प्रत्येकीचें मन खूप उल्हासित झालें होतें. त्या भेटवस्तूची घडी घालण्यापूर्वी बराच वेळपर्यंत त्या तिच्याकडे डोळे भरून पहात राहिल्या. त्यानंतर आपल्या अपेक्षांसंबंधीं त्या खूप वेळपर्यंत गप्पा मारीत बसल्या. जरा विचार करा तर खरे! शांघायमध्यें अगदीं नवेंच जग आहे. दिवसा फक्त सात तास काम, आणि मजुरीहि इथल्या पेक्षां जास्त! शिवाय रविवारीं सुट्टी आणि अगदीं बॉक्समध्यें बसून पहायला फुकट सिनेमा.

नजराणा देण्यासाठीं आह फूच्या आईची निवड करण्यांत आली; आणि तिनेंहि आपण तें काम उत्तम प्रकारें पार पाडूं अशी हमी दिली. परंतु अजूनहि त्यांच्यांत अशा कांहींजणी होत्या कीं ज्यांना ते लोक आम्हां म्हाताऱ्यांचा नजराणा स्वीकारतील कीं नाहीं याबद्दल शंका वाटत होती.

— ४ —

आह फू पुन्हां त्याच माणसाबरोबर घरीं आला. म्हातारीच्या कानीं त्यांच्या पावलाची चाहूल पडतांच तिचें हृदय जोरजोरांत धडधडूं लागलें; आणि ज्या हातांत तिनें सुई धरलेली होती तो तिचा हात थरथर कापूं लागला. त्यांच्याकडे डोळे वर करून पाहण्याचीहि तिला हिम्मत होईना. ती त्या ठिकाणीं तशीच गुपचूप बसून राहिली.

"आई, जरा खालीं स्वयंपाकघरांत जा पाहूं!"

नेहमींप्रमाणें आह फू म्हणाला. याचें उत्तर प्रेमळ शब्दांत द्यावें अशी तिला इच्छा झाली. पण कां कोण जाणे, तिच्या तोंडून एक शब्दहि बाहेर पडला नाहीं. तिनें आपल्या चिंध्या गोळा केल्या आणि याच वेळीं तिचा हात त्या मौल्यवान् गाठोड्यावर पडला. तिनें त्या माणसाकडे पाहण्यासाठीं डोकें वर उचललें. त्याच्या डोळ्यांतून सहानुभूति पाझरत होती. यामुळें तिला जरा धीर आला. जिन्याकडे जात असतां ती जेव्हां त्यांचेजवळ आली तेव्हां जरा अडखळली.

"काय ग आई? काय आहे?" आह फूनें आईची ती चमत्कारिक वागणूक पाहून विचारलें.

ती परत फिरली आणि आह फूच्या मित्राजवळ जाऊन उभी राहिली. आपल्या छाती जवळ ठेवलेला तो नजराणा काढून मोठ्या हिंमतीनें त्याच्या हातीं देत ती म्हणाली,

" हे त्यांच्यासाठीं आहे ! आमच्यावतीनें त्यांना हा नजराणा द्या ! "

" त्यांना ? हे ' ते ' कोण बुवा ? "

" वा: ! तुम्हांला माहीतच आहे कीं ! अहो, ' तेच ' ज्यांच्याविषयीं तुम्ही नेहमीं बोलत असतां ! आम्ही म्हाताऱ्या बायकाहि त्यांना ओळखतों. "

" अरे बापरे ! "

" आम्ही चौदा बायकांनीं ठरवलें कीं आपणहि कांहीं तरी मदत करावी. आणि ही आहे ती ! "

त्यानें घाईघाईनें तें गाठोडें सोडलें. एकदम त्याच्या चेहऱ्यावर आनंदाचें हास्य चमकूं लागलें. आह फू खुषींत येऊन जोरानें ओरडला,

" काय तुम्ही म्हाताऱ्या बायकांनीं हें तयार केलंय म्हणतां ? '

आनंद आणि अभिमान यांच्या मिश्रित भावनांच्या आवेगानें ती थरथर कापूं लागली. उत्तर देण्यासाठीं म्हणून जेव्हां तिनें मान डोलाविली तेव्हां आपल्या यशस्वितेचें तें प्रतीक पाहून तिचें तिलाच हंसूं आलें

" आम्हांला आशा आहे कीं ते लवकरच येतील ! "

" पण काय ग आई, हें तुला कळलें तरी कसें ? "

" मी तुम्हां लोकांचीं बोलणीं ऐकलीं आणि माझ्या ध्यानांत आलें सर्व!" तिनें मनमोकळेपणानें हंसत हंसत उत्तर दिलें. आतां तिला चांगलाच आत्मविश्वास वाटूं लागला होता.

" हा, हा, हा, हा, ! ! " त्यांनीं मोठ्या खुषींत येऊन जोरजोरानें हंसण्यास सुरवात केली. त्यांना अशा प्रकारें हंसतांना पाहून म्हातारीची अस्वस्थता पुन्हां जागृत झाली. अखेर मोठा धीर करून तिनें एक प्रश्न विचारला.

" बरं, एक गोष्ट विचारत्ये तुम्हांला. तुमच्या संस्थेंत म्हाताऱ्या बायकांना घेतलें जातें कां ? "

" तुमच्या सारख्या लबाड म्हाताऱ्यांना नाहीं घेत आम्ही ! " आह फू नें हंसत हंसत उत्तर दिलें.

नंतर मोठ्या गंभीरपणें डोकें हलवून तो म्हणाला,

" आमच्या संस्थेंत म्हाताऱ्याच काय पण सारी दुनिया सामील होऊं शकते. मात्र अट ही कीं प्रत्येकानें काम करण्यास तयार असलें पाहिजे. "

" हेंच तर मला जाणून घ्यायचं आहे. बरं, मला आणखी असं सांगा

कीं त्यांना काय हवंय ? आम्ही म्हाताऱ्या बाया तेंच करूं. आमच्यामध्यें निदान वीस-बावीस जणी तरी अशा आहेत कीं काम पडल्यास ज्या जरूर येतील ?"

" ओहो ! वाहवा ! छान ! खूप छान ! ! ! "

इतक्यांत इतर बायकाहि एकीमागून एक त्या खोलींत गोळा झाल्या. त्याहि ही कहाणी ऐकूं इच्छित होत्या. म्हातारीच्या चेहऱ्याची तांब्याच्या धातूसारखी कातडी आनंदातिशयानें लाल दिसूं लागली. आणि ती आपल्या चिंध्या उचलून जिन्याकडे जाऊं लागली. तिच्या कानीं आलें—

" गम्मतच आहे म्हणायची ! " दोघे तरुण एकमेकांना हंसत हंसत म्हणत होते, " या म्हाताऱ्या बायकांनीं तर कमाल केली बुवा ! "

तिनें त्या दोघांकडे भरलेल्या डोळ्यांनीं पाहिलें. आणि एक शेवटची नजर त्या झेंड्यावर टाकली. लालभडक कापडावर काळ्या रंगाचा विळा हातोडा खूप उठून दिसत होता.

यानंतर ती जिना उतरून खालीं कशी आली हें तिचें तिलाहि समजलें नाहीं.

★

# तो दिवस : : मूळ लेखक : तिंग लिंग

**स्थळ** : शांघाय **काळ** : सन १९३२

कुठें एकादें चिटपांखरूंसुद्धां दृष्टीस पडत नव्हतें. सगळीं घरें अगदीं रिकामीं पडलीं होतीं. पडक्या भिंती दारू पिऊन झिंगलेल्या माणसा-प्रमाणें झोंकांड्या खात असल्याचा भास होई. कारण त्या इतक्या हादरल्या होत्या कीं आतां पडतात कीं मग पडतात अशी स्थिती झाली होती. रस्त्याच्या दोहों बाजूस फुटक्या विटांचे व कौलांचे ढीग लागले होते. एका मोठ्या वाड्याचा सज्जा मोडून पडला होता. व त्याच्या जवळच भले मोठे खळगे पडलेले दिसत होते. संध्याकाळची वेळ. मोठमोठीं भोकें असलेल्या एका भिंतिवर सूर्याचे शेवटचे किरण रेंगाळत होते. त्या भिंतिवर कावळ्यांचे थवे उगीचच इकडून तिकडे उडत होते, मधूनच एखादी बंदुकीची गोळी भिंतिवर येऊन

भादळे आणि कावळे दूर उडून जात. दूर अंतरावरून तोफांच्या गडगडण्याचा आवाज ऐकूं येत होता.

गल्लीच्या दुसऱ्या टोकास एका घरांत कांहीं घायाळ झालेले शिपाई पडले होते. सुमारें चाळीस पन्नास असतील. पण त्यांना सगळ्यांना दोनच खोल्यांत कोंबून भरलें होतें. एका कोपऱ्यांत रॉयफलीचा ढीग होता, घराच्या धाब्यावर गवत व कागदाचे तुकडे विखुरलेले होते. एका कोपऱ्यांत फुटक्या कांठांचें कांहीं पेले फेंकून दिलेले होते.

जमिनीवर तांब्याचीं व चांदीचीं कांहीं नाणीं पडलीं होतीं. शेजारींच दोन फासे खुळखुळ वाजत होते. त्यांच्या सभोंवार कित्येक उत्कंठित व तरबेज असे पिवळे चेहरे दाटीदाटीनें बसले होते. त्यांचे डोळे त्या नाचणाऱ्या फाशांवर खिळलेले होते. ते लोक जोरजोरांत ओरडत होते :

" नऊ ! होय नऊ ! ! नऊ नि सात ! ! ! "

कांहीं शिपाई जमिनीवर बसून गप्पा मारीत होते; कांहीं आरामांत गवतावर पडल्या पडल्या तंगड्या वर करून शीळ घालीत होते. ते मध्येंच शीळ थांबवीत व घाणेरडीं अश्लील गाणीं गायला सुरवात करीत. त्यांच्या त्या आरडाओरडीनें सगळें घर दणाणून जाई.

" आपण लोक आंतरराष्ट्रीय प्रदेशांवर हल्ला कां बरें करीत नाहीं ? " जेव्हां सगळीं घाणेरडीं गाणीं म्हणून संपलीं तेव्हां चिन पावनें आपली टकळी सुरूं केली; " त्या बुटक्या सैतानांना त्या साल्या जपान्यांना, नव्हे त्यांच्या बापालाहि मी भीत नाहीं. जेव्हां मी त्यांची कत्तल करतों तेव्हां असं वाटतं जणूं मी कोंबडीचीं कोवळीं कोवळीं पिलंच कापतो आहे ! त्यांना रायफली घेऊन चाल करून येत असतांना मी पाहिलं आहे. बेट्यांच्या रायफली भीतीनं थरथरां कापत असतात ! भ्याड, पाजी, हरामखोर लेकाचे !"

" असल्या या लढाईचा शेवट होणें कधीं तरी शक्य आहे काय ? " तरणाबांड चाव लुंग चिनच्या म्हणण्याला दुजोरा देत त्वेषानें म्हणाला,

" आम्ही त्यांना मारून पिटाळून लावतों. आणि आतां त्यांची इतिश्री होणार इतक्यांत वरून हुकूम येतो कीं " चढाई थांबवा ! " या युरोपियन लोकांना आम्ही इतकें कां घाबरावें ? जितकें जितकें आम्ही भितों तितकें तितकें ते जास्तच हात धुवून पाठीस लागतात. या सगळ्याचा परिणाम काय

होईल माहीत आहे ? अशानें चीन वांचणार नाहीं. ज्यांचीं मनं गुलाम बनलीं असतील त्यांनीं भ्यावं हवं तर ! पण माझ्यासारख्या......मला आपल्या मनाप्रमाणं वागायचंय ! सगळे चिनी लोक जर माझ्या या मार्गानें गेले असते तर आज चीनची परिस्थिति कांहीं औरच दिसली असती."

" काय ? जें मनांत येईल तें केलें असतेस ? थू : तुझी ! असं तर ते सैतानी जपानी करीत असतात. पण मी तुला असं विचारतों, ' काय केलं असतंस रे तूं ? आपणहि शिपाईच आहोंत. पण आपण कांहीं त्यांच्याप्रमाणें वागत नाहीं. काल सियांग पो रोडवर मी जीं बायकांचीं प्रेतं पाहिलीं तीच गोष्ट घे ना ! त्यांचा मृत्यु मोठ्या रहस्यपूर्ण पद्धतीनें झालेला आहे. त्यांचे सगळे कपडे फाडलेले व ओरबडलेले दिसत होते. एकीचें वक्षस्थळ कापलेलें होतें दुसरीच्या छातीवर दातांचें व्रण होते. त्यांच्या पोटावरून रक्ताचे ओघळ वाहात होतें. त्यांच्या तोंडांनून रक्त बाहेर पडत होतें—अन् म्हणून मी म्हणतो कीं हे हरामजादे हिंस्र पशूपेक्षांहि जास्त निर्दय आहेत. जगांतइतरत्र कोठेंहि अशा प्रकारें स्त्रियांच्या अब्रूवर घाला पडत नसेल. मनाला येईल तसे वागत असतात शिंचे ! सुव्वर कुठले. खरोखर जर हे माझ्या हातीं सांपडतील तर मजा येईल म्हणशील !"

" बस्स कर तुझी वटवट ! तुला त्यांचा हेवाच वाटतोय. पण काय रे, गेल्याच आठवड्यांत तुला ' औरत ' मिळाली होती नां ? आणि मग काल रात्रीं गांवांत कशाला सटकूं पहात होतास ? संत्र्यानें तुला बघितलें अन् अडविलें म्हणून ! नाहींतर केलीच असतीस चंगळ !! "

हें ऐकून गवतावर लोळत पडलेला वांग ओ, चाव लुंगला एक ठोसा लगावण्यासाठीं झटक्यासरशीं उठून बसला. पण इतर शिपायांनीं त्याला आवरून धरल्यामुळें तो स्वतःशींच बडबडत पुन्हां गवतावर लोळूं लागला.

'- बरांय, सुव्वरके बच्चे ! जरा सांभाळून अस आतां ! " इतके बोलून तो पुन्हां गाऊं लागला. पण मध्येंच थांबून म्हणाला, बरं का चांव लुंग ! हे कसाई—हे जंगली जपानी शिपाई चीनच्या जनतेवरच सूड उगवतात; कारण ते आपलें—आपल्या फौजेचें—कूसमुद्धां वांकडें करूं शकत नाहींत. आम्ही चिंगसींगतिंग आणि च्वान फिंगच्या लढाया मोठ्या हिरीरीनें लढलों आहोंत. या कुत्र्यांशीं आमची तुलना तरी होईल कां ? तीं भुतें आहेत तर आम्ही

देवदूत आहेंत. जातीचे चिनी आहेंत म्हटलं चिनी! आम्ही थोडीशी लूट-मार करतों. संधि मिळाल्यास एकाद्या स्त्रीचा उपभोगहि घेतों; कधीं कधीं कांहीं दुर्दैवी जीवांना यमसदनींहि धाडतों नाहा असें नाहीं; पण हें सगळें त्यांच्या मानानें कांहींच नव्हे. महिनानुमहिने आम्हांला पगार मिळत नाहींत. तेव्हां 'आगेकूच' चा हुकूम मिळतांच जर आम्ही खुष झालों तर लोकांनीं आम्हाला दोष काय म्हणून द्यावा? हे जपानी डाकू तर जिकडे तिकडे आगी लावून देतात आणि दिसेल त्याला मारुन टाकतात. पिसाळलेलीं कुत्रींच जणूं! सर्वांत कळस म्हणजे त्यांना या गोष्टी करण्याची परवानगी आहे; किंबहुना तसें करण्याचा त्यांना हुकूमच आहे."

इतक्यांत कानठळ्या बसविणारा एक जोराचा आवाज झाला. जवळच्याच एका घरावर एक तोफेचा गोळा येऊन आदळला होता. त्या घराचा अगदीं चुराडा झाला होता.

आकाश जास्तच धुरकट झालें. खोलींतहि इतका धूर भरला कीं शेजारच्या माणसाचा चेहराहि स्पष्टपणें दिसेना. पण शिपाई पूर्वीप्रमाणेंच ओरडत होते. "नऊ? हेय नऊ! नऊ अन् सात!!"

एका शिपायाचे खिसे चांदीच्या व तांब्याच्या नाण्यांनीं भरले होते. तो त्या जुगार खेळणाऱ्या लोकांमधून उठून जे लोक आतांपर्यंत गप्पा मारीत बसले होते त्यांच्यांत येऊन मिसळला. दांत विचकुन त्यानें आपल्या खिशांतून एक चुरगळलेली सिगारेट काढली आणि ती शिलागावून तिचे झुरके मारीत तो म्हणाला. "हां! हें ठकि आहे!," कोणा एका विशिष्ट व्यक्तीला उद्देशून न म्हणतां स्वतःशींच बोलत असल्याच्या आविर्भावांत तो उद्गारला," उद्यां मला एक 'माय डार्लिंग'चा सिगारटेचा डबा विकत घेतां येईल."

"मसणांत जावो तुझी ती 'माय डार्लिंग'! तुला हे तोफांचे आवाज ऐकूं येत नाहींत? कदाचित् आज रात्रींच तुझा सारा खेळ खलास होईल. मग तुझ्या या पैशाचें काय होणार?"

"तुला वाटतें कीं मी मरून जाईन! असंच कीं नाहीं? हं: बाकी आपल्याला जर आंतरराष्ट्रीय विभागावर हल्ला करून त्या भुतांना जहाजांतून पिटाळून लावण्याचा हुकूम दिला गेला नाहीं, जर आपण असेच उंदराघुशींप्रमाणें बिळांत दडून राहिलों तर आमची इतिश्री होणार यांत कांहींच शंका नाहीं.

या बिळांतून तोंड वर काढणें मनांतल्या मनांतच राहून जाईल. जपान्यांजवळ आमच्यापेक्षां चांगल्या रायफली, चांगल्या बंदुका, चांगला दारूगोळा आहे यांत शंका नाहीं. पण आमच्याजवळ आमचे प्राण आहेत आणि त्या प्राणांना धोक्यांत घालायला आम्ही एका पायावर तयार आहोंत. पण असे करायला आम्हांला या परवानगीच मिळत नाहीं, उंदराच्या मोतीनें मरण्यासाठीं आम्हांला या बिळांतून अडकून पडावेंच लागणार काय? म्हणे, वाट पहा! हं! वाट पहा!!"

"आपल्या लेफ्टनंटची काय इच्छा आहे?"

"लेफ्टनंट कांहीं करूं शकत नाहीं. तो स्वतंत्र थोडाच आहे? त्यालाहि हुकूम पाळावेच लागतात कीं नाहीं?"

"तें असो! पण जनरल काय करणार? मी असं ऐकलंय कीं तो जपान्यांशीं लढूं इच्छितोय!"

"नक्कीच! जनरल आम्हांला सांगतोय खरा कीं जपान्यांशीं लढायची त्याची फार इच्छा आहे म्हणून पण त्याचं तें सांगणं नुसतं तोंडदेखलं आहे.

वर्षानुवर्षे—दहा वर्षांपासून—आम्ही त्याच्या हाताखालीं काम करतोय; सगळ्या देशभर त्यानें लढाया केल्या आहेत; आणि आमच्या बांधवांचे व मित्रांचे बळी देऊन त्यानें हा जनरलचा हुद्दा मिळविला आहे. यावेळीं जपानी आमच्यावर हल्ला करीत आहेत आणि आम्हीं कांहीं पगारहि मागत नाहीं. आम्ही आपले प्राण किती स्वस्त भावांत विकून राहिलों आहोंत! कारण काय, तर आपल्या लोकांशीं लढण्याऐवजीं जपान्यांशीं लढतां लढतां मरून जाणें आम्ही बेहेत्तर समजतों. लढाया मारून आम्ही पोटालाहि मिळवतों म्हणा, पण आपल्या देशबांधवांसाठीं व देशासाठीं प्राणार्पण करण्याची आमची महत्त्वाकांक्षा आहे. पण जनरल?...त्याला आपल्या देशाविषयीं काडीमात्रहि आपलेपणा नाहीं, त्याला लोकांच्या मनाची व प्राणाची मुळींच पर्वा नाहीं;—निदान असें दिसतें तरी खरें!"

"जपान्यांविरुद्ध लढायला तयार होण्याशिवाय त्याला गत्यंतर नव्हतें हें मात्र खरें. सरकारशीं त्यांचा कसा काय संबंध आहे?"

"तिथें त्याचे सगळेच दोस्त आहेत म्हणा—त्या बाजूनें त्याला कसलीहि

भीति नाहीं. तरीपण सध्यां लोक असें म्हणतात कीं तो तह करूं इच्छित आहे."

"करुं द्या तह! त्याचाच एकटयाचा होईल तो तह. आपण लढतच राहूं आपल्यासाठीं तह नाहीं. आपले काम लढत राहण्याचें. लढायचें अखेरपर्यंत लढत रहायचें!—अन् तेंहि आपल्याच लोकांशीं!"

"इतकीं वर्षे झालीं आपल्या नशिबींची लढाई कांहीं अजून सुटली नाहीं. मात्र आतां अखेरच्या घडीसहि खरीखुरी लढाई होणार! लढाई? छे: यादवी! मी म्हणतों, पुढं होणार तरी काय?—अन् हे सांगतात कीं 'आतां लढाई थांबवा!' सगळा सावळा गोंधळ माजलाय!

"काय? आपण जपान्यांना विजयी होऊं द्यायचं? शक्य नाहीं! मी गुलाम बनणें शक्य नाहीं! मुळींच शक्य नाहीं!"

आकाश जास्तच काळेंकुट्ट झालें. जुगार खेळणाऱ्यांनीं खेळ बंद केला, आणि ते इकडे तिकडे पांगले. कांहींजण समोर गवतावर लोळूं लागले- वादविवादाला जास्तच जोर चढला.

"आपल्या देशांत आपणच गुलाम व्हायचं; अं? पण या गुलामांत कांहीं चांगले लोकहि असतात. बरं का! पंधरावीस दिवस झाले. आमचा मुक्काम त्यावेळीं नीनतौला होता. एके दिवशीं मी मैदाना जवळून घाईघाईनें चाललों होतों. तिथें खूप गर्दी जमली होती. तीळ ठेवायला सुध्दां जागा नव्हती. मला वाटलें, आपणहि जाऊन पहावें काय आहे तें. कारण ती जनतेची एक जाहीर सभा आहे असें मला कुणीतरी सांगितलें होतें. दोन तरुणांनीं मला सभेकडे येतांना पाहिलें. ते मजजवळ आले आणि माझ्याशीं बोलूं लागले.

"आनंद झाला तुमच्या येण्यानं," ते म्हणाले, "आतां सगळ्या मजुरांनीं किसानांनीं आणि शिपायांनीं एक झालं पाहिजे."

कांहीं मजुरांनीं व्यासपीठावरून जोरजोरांत व्याख्यानं दिलीं. फार छान बोलले ते. नंतर गुलाम देशांत राहणारा एक माणूस व्यासपीठावर चढला. तो कोरियाचा राहणारा होता. तो खूप बोलला. त्याचें व्याख्यान मोठें जोरदार होतें. दर वाक्यागणिक टाळ्या पडत होत्या. आणि मग सगळे लोक जोरजोरांत ओरडूं लागले. "साम्राज्यशाहीचा नाश हो! जगांतील मजुरांनों

एक व्हा !!" सगळयांच्या बरोबर मींहि जोरजोरांत ओरडलों. त्यावेळीं पुष्कळ लोक मजकडे वळून पहात होते. तो कोरियन मोठा भलामाणूस दिसत होता, आणि तरीहि तो गुलाम देशाचा रहिवाशी होता."

"आपण अजून तसे गुलाम झालों नाहीं हें त्यांतल्या त्यांत बरें आहे म्हणायचें ! तरीपण आपली स्थिति अशी काय चांगली लागून गेलीय ? आपल्या सभोंवती आपले भाईबंद दुःखांत आहेत. शेतकरी, शहरांतील मजूर यांच्याकडे पहा आणि ज्याची स्वतःचीं लहान लहान दुकानें आहेत त्यांचेकडेहि पहा, यांचे जीवन किती दुःखपूर्ण आहे बरें ! मी पुष्कळ हिंडलोय, अन् पुष्कळ पाहिलंय. मूठभर सरकारी अधिकारी आणि अत्यंत धनाढ्य असे जमीनदार व व्यापारी सोडल्यास अशी एकादीच व्यक्ति सांपडेल कीं जी आपलें जीवन दुःखांत व हालांत कंठीत नाहीं. रुपये हो, रुपये असतील—पैसा असेल, तर मात्र सारीं सुखें व सगळया चैनी तुमच्या पायाशीं लोळण घेत येतील. गुलाम देशांतहि जर माणसाजवळ पैसा नसेल तर त्याला सुख मिळत नाहीं."

"आमच्याजवळ पैसे येणार नाहींत जोपर्यंत पण छे : ! असं नाहीं व्हायचं !"

एक गोळी सूं सूं करीत आली आणि समोरच्या घराच्या दुसऱ्या मजल्याची खिडकी फोडून आरपार निघून गेली.

"पुन्हां सुरुं झाली बेटी कटकट !"

"छे: रे ! इतक्यांत कुठली सुरवात ? ते तर रोज रात्रीं धाड घालतात. पण आज येऊं दे तर खरे या हरामखोरांना ! चटणी उडवून टाकूं सगळ्यांची ! च्या . . . !"

आकाश जास्तच काळेकुट्ट दिसूं लागले. लोक अंधारांतच गप्पा मारीत होते. खोलींत गारठा पसरला होता. त्यामुळें लोक जरा एकमेकांस चिकटून बसले. फक्त त्यांच्या पडछायाच दिसत होत्या. त्याहि अगदीं अंधुक ! जवळचें एक शहर जळत होतें त्याच्या ज्वाळा क्षितिजाजवळ दिसत होत्या. त्यामुळें ढगांवरहि कांहींसा सोनेरी रंग चढला होता.

अंधारांत रस्त्यावरून येणाऱ्या कुणीतरी व्यक्तीची पावलीं वाजलीं

" कार्पोरल चुंग येतोय ! " सगळेजण एकदम उद्गारले " कदाचित् त्यानें आपल्यासाठीं कांहीं महत्त्वाची बातमी आणली असेल ! " असें म्हणून ते उतावळेपणानें त्या आवाजाच्या रोखानें डोळे लावून बसले.

त्यांना दुसरा एक बारीक आवाज ऐकूं आला.—गवताच्या वाहणा घालून चालल्याचा आवाज होता तो.

कार्पोरल चुंगची हडकुळी व काळी सावली दरवाजांत दिसतांच सगळ्यांच्या तोंडून एकच प्रश्न एकदम बाहेर पडला. " काय हालहवाल आहे रणभूमी-वरील ? "

कार्पोरल चुंगनें याचें उत्तर दिलें नाहीं. उलट त्यानें सर्वांना उठून तयार होण्याचा हुकूम दिला. सगळे समजून चुकले त्यांना रणमैदानावर जावयाचें होतें.

जेव्हां ते आपलें सामान सुमान आवरायला म्हणून उठले तेव्हां त्यांचे हातपाय थंडीनें आंखडून गेले होते. त्यांनीं आपले बिस्तरे गुंडाळले व राय-फली खांद्यावर टाकल्या. दुसरा कार्पोरल आपलीं माणसें घेऊन आला; आपल्या एका शिपायाची काडतुसें त्याच्या पेटींत भरण्यास मदत करीत तो म्हणाला.

" आज रात्रीं ते आपल्यावर खात्रीनें हल्ला करणार ! आपण त्यांच्या आधींच त्यांच्यावर हल्ला करून त्यांना घाबरवून सोडूं आणि मग त्यांच्या शस्त्र सज्ज गाड्या, ( टँक्स ) व मशीनगन्स काबिज करूं. त्या कुतरड्यांचा नायनाट केल्याखेरीज आतां भागणार नाहीं. शांघायच्या लोकांचा आपल्या-वर विश्वास आहे. आमच्याच भरवशांवर ते बसले आहेत. आमच्या शौर्याचें ते गुणगान करीत असतात. आपण आपल्या एकोणसि नंबरच्या पलटणचें नांव इतिहासांत अजरामर करून सोडूं. आजपर्यंत आपण ज्या लढाया केल्या त्या आजच्या लढाईपुढें फिक्या ठरतील. आपला देश नि आपले लोक यांचें रक्षण करण्यासाटीं आपण आपल्या रक्तानें पाट वाहवीत आहोंत. एक दिवस असा उगवेल-अन् तो कांहीं फार दूर नाहीं हें निश्चित कीं आपल्या साऱ्या पलटणी आपल्याला येऊन मिळतील. आपला पराजय होऊं लागला तरी मागें हटावयाचें नाहीं. जिथें असूं तिथेंच लढतां लढतां मरून जाऊं ! "

याच वेळीं एक दुसरा कार्पोरल आला. त्याला पाहतांच तो बोलणारा कार्पोरल ओरडला.

"अरे, घोटाळा झाला! तूं इथे कशाला आलास धरपडायला? मी तुला सकाळीं सांगितलें होतें ना कीं तूं संत्र्यांवर लक्ष ठेव म्हणून?"

त्यांचीं अंतःकरणें जड झालीं होतीं. शरीरें कसलेली होतीं. अखेर सगळे तयार झाले. आणि आपल्या कार्पोरलच्या मागोमाग चुपचाप बाहेर अंधारांत निघून गेले.

गोळ्यांचा फडफडाट व तोफांचा गडगडाट जवळजवळ येत आहे असें वाटूं लागलें. ती अरुंद गल्ली मात्र निःस्तब्ध व भयानक रात्रींच्या अंधारांत जणूं विलुप्त होऊन गेली होती.

★

# सभा

: : मूळ लेखक :—शिह मिंग.

आमच्यापैकीं कोणालाही त्याचें नांव ठाऊक नसणें शक्य आहे. आम्हीं त्याला लावली म्हणत असूं.

'त्यानंतर कित्येक दिवसांत लावली कोणत्याही सभेंत दिसला नाहीं.' आमच्यापैकीं कोणी तरी म्हटलें.

आणि याच वेळीं दरवाज्यावर तीन टिचक्या वाजल्या- बरोबर तीन !

'आला तो !'

एकानें दरवाजा उघडला. दुसऱ्यानें खिडकीवरील सफेद पडदे ओढून घेतले.

'तूं आज तीन आठवड्यांनीं दिसतो आहेस !'

'तुम्ही सगळेजण नुसतीं घड्याळें आहांत !' तो उत्तरला.

'मग, ?...' लावलीवर सगळीकडून निन्देचा वर्षाव होऊं लागला. तो आपला सुकट चेहेरा पुढें करून सर्व ऐकत राहिला. त्याचा चेहरा वाळलेल्या गवताप्रमाणें फिकट पिवळा होता, आणि त्याच्या डोळ्याभोंवतीं लाल रेघा उमटलेल्या दिसत होत्या.

धिक्काराची वावटळ जरा ओसरल्यावर लावलीनें आपल्या न येण्याचें कारण सांगण्यास सुरवात केली. सभोंवती लाल रेघा असलेले त्याचे डोळे

त्याच्या गंभीरतेची व सच्चेपणाची साक्ष देत होते. अशा प्रसंगानंतर आम्ही सर्वजण या निष्कर्षावर येत असूं कीं, 'खरोखरीच याची वाट पहात न बसतां आम्हाला आमचें काम चालू ठेवतां आलें असतें. याच्यावर आमच्यापेक्षां जास्त जबाबदारीचीं कामें असतात, यांत मुळींच शका नाहीं!'

या नंतर एक 'खटला' चर्चेसाठीं पुढें आला. आमच्यापैकीं प्रत्येकजण बाहेर आवाज जाणार नाहीं अशी काळजी घेत पण ओरडण्याचा प्रयत्न करूं लागला. लावलीचा फिक्कट पिवळा चेहरा रागानें लालबुंद झाला होता. तो वळकटीवर हनुवटी टेकून बसला होता. त्यानें डोळे वटारले होते.

'त्याला चांगला इंगा दाखविला पाहिजे.' एकानें टेबलावर जोरांत मूठ आपटीत आपटीत म्हटलें; पण ती मूठ इतकी हळू बसली कीं तिचा कांहीं आवाज झाला नाहीं.

'माझा याला विरोध आहे.' लावलीनें जाहीर केलें.

'आपण आतां पोलादी कायदा लागूंच केला पाहिचे असें माझें ठाम मत आहे. एका आळशी व बेकार माणसाला शिक्षा देतांना आपण कोणत्याहि प्रकारच्या कोमल भावना किंवा जवळचे संबंध यांचा विचार करतां कामा नये!'

बडबड जोराजोरांत सुरूं झाली. आतां आवाज हळू करण्याचा आम्ही फारच थोडा प्रयत्न करीत होतों. कित्येकांनीं खिडक्यांकडे इशारा करून मोठ्यानें बोलणाऱ्यांना गुप्तपणाची आठवण देण्याची कोशिस केली, तर कांहीं जणांनीं नाकावर बोट ठेवून किंवा खिडकीकडे हात दाखवून आवाज कमी करण्याची सूचना केली.

'मला बोलूं द्या!' लावलीनें आपल्या जड आवाजांत म्हटलें, 'त्याची टोपी इतकी लालभडक आहे आणि गुप्त पोलीस तर हात धुऊन त्याच्या पाठीस लागले आहेत. अशा वेळीं त्याला नाउमेद करण्याऐवजीं त्याला एखादा नविन पोशाख दिला पाहिजे; म्हणजे त्याला आपलें काम व्यवस्थितपणें करतां येईल. त्याची जबाबदारी मी आपल्यावर घेतो.'

अखर त्या सुस्त आळशी सभासदाला—याला आम्ही चारपोस असें म्हणत असूं—लावली आपल्याबरोबर एक नवीन काम करण्यासाठीं शहराकडे परत घेऊन गेला.

कित्येक दिवस लोटले! लोकांनीं आपले लोकरीचे गरम कपडे काढून साधे पातळ कपडे वापरण्यास काढले. पुष्कळांनीं आपलीं उघडींबोडकीं शरीरें रस्त्यांतून मिरवीत श्रमाचा घाम जळत्या उन्हांत सुकविण्यास सुरवात केली.

एके दिवशीं तिसऱ्या प्रहरीं कित्येक महिन्यानंतर चरपोस मला भेटायला आला. मी आतां शहरांत आले होते व त्याला पुनः पूर्वीप्रमाणें भेटूं शकत होतें. त्यानें उभ्या उभ्याच आपण आणलेला निरोप मला तीन वाक्यांत सांगितला आणि त्याला बसण्यासाठीं मी खुर्चीहि पुढें ओढली नव्हती इतक्यांत त्यानें आपली टोपी उचलली आणि तो चालूं लागला. आपल्या या सुस्त साथी-दाराची इतकी प्रगति झालेली पाहून मी थक्क होऊन गेले. कारण प्रत्येक वेळीं रेंगाळत राहून ऐसपैस गप्पा मारण्याची त्याला संवय होती. लावली जें म्हणाला तें त्यानें खरें करून दाखविलें तर!

तिसऱ्या दिवशीं मी आपल्याजवळचे सर्वांत मौल्यवान् कपडे चढविले आणि एका पार्ककडे गेले. तळ्यावर कमलांच्या पानांचा हिरवा गालिचा पसरलेला होता आणि त्यावर गुलाबी रंगाचीं कमळें हंसत होतीं. वरून अशोकाच्या फांद्या लवून त्यांना कुरवाळीत होत्या.

‘ किती छान दृश्य आहे ! ’चरपोस माझ्या समोर सायकल हातांत धरून उभा होता.

‘ काय आचरट पहारेकरी तरी बाई ! ’ त्याचेवर सूड उगविण्यासाठी नाक फेंदारत मी म्हणाले.

‘ तूं तर पक्की बूर्झ्वा आहेस ! ’ तो म्हणाला.

मी हंसलें. तो सुद्धां पुरा बूर्झ्वा बनला होता. त्यानें निळा ओव्हरकोट घातला होता व डोकीवर बांबूची विलायती पद्धतीची हॅट ठेवली होती. आमच्या भ्रचावांचा हाच मार्ग होता. शक्य तितकें अमीराप्रमाणें दिसावयाचें. लावलीनें तर सर्वांवर ताण केली होती. त्यानें विलायती सूट परिधान केला होता, पांढरा रेशमी नेकटाय बांधला होता.डोकीला खूपसें सुगंधी तेल चोपडलें होतें आणि तोंडांत एक जळती सिगारेट धरून एखाद्या संस्थानिकाच्या उडाणटप्पू पोराप्रमाणें तो इकडे वावरत होता. तो जेव्हां आमच्याजवळ आला तेव्हां पाश्चात्य पद्धतीनें छातीकडे हात नेऊन जरा वांकून त्यानें नमस्कार केला.

कांहींतरी बोलला आणि आमच्याकडे विशेष लक्ष नसल्यासारखे दाखवून आमच्याजवळून निघून गेला.

चरपोससाहेब मजबरोबर तलावासमोरील चहाच्या दुकानांत शिरले. खिडकीजवळील लांब टेबलावर तऱ्हेतऱ्हेचे खाण्याचे जिन्नस मांडून ठेवले होते. चहा तयार होता. मी एका खुर्चीवर बसले. चरपोस बाहेर निघून गेला.

जाड जाड बुटांचा भारी आवाज आणि कांद्यांचा उग्र दर्प आला. कांदा हें उत्तरेकडील लोकांचें खास खाद्य आहे. दोन जाडजूड पोलिस शिपायी आंत आले आणि खुर्चीवर बसले. जणूं ते आमचे पाहुणेच होते. यानंतर दुसरे ' बूर्झ्वा ' लोक आंत आले. त्यांनीं या ' सुधारकी कॉमेरडा ' कडे मोठ्या चिंतायुक्त दृष्टीनें पाहिलें. आमच्या सुधारक भाईनीं आपापलीं ओळख करून दिली. आमची ही चहापार्टी ' शांतता व सुव्यवस्था राखणाऱ्या ' मायबाप सरकारच्या परवानगीनें होत होती. तरी पण त्या दोन पाहुण्यांच्या देखरेखीखालीं आम्हाला आपलें काम उरकावें लागणार असा रंग दिसत होता. त्यांनीं तेथें थांबावयाचें असें ठरवलें असावें; कारण विद्यार्थ्यांच्या सभेवर कडक नजर ठेवण्याचा त्यांना हुकूम दिला गेला होता. मग ते विद्यार्थी कोणत्या कां प्रकारचे असेनात ! त्याच्याशीं त्यांना कांहीं कर्तव्य नव्हतें. आम्ही इतरांची वाट पहात होतों. यामुळें तोंपर्यंत त्यांचेशीं दोस्ती करणें आम्हाला भाग होतें. लावली, चरपोस, आणि ज्यांच्याकरितां हें पार्टीचें खास नाटक रचलें गेलें होतें तो तरुण असे तिघेजण एका मागोमाग हळूहळू येऊन पोहोंचले.

अशा या नाजूक प्रसंगीं लावलीला विदूषकीपणा करायचें सुचलें. त्यानें आपला पांढरा टाय सोडला आणि तो वर उडवीत उडवीत तो नाचूं गाऊं लागला. तो असे कांहीं विचित्र आणि हास्यास्पद अंगविक्षेप करीत होता कीं, बघणारे सर्व लोक पोट धरधरून हसूं लागले. ते लोक हंसण्याखिदळण्यांत दंग झाले आहेत असें पाहून तो आमच्या पार्टीच्या त्या मुख्य तरुण पाहुण्याजवळ गेला आणि खांद्यावर थाप मारीत त्याला म्हणाला,' जा आतां निघून लवकर ! '

तो चुपचाप उठला आणि थट्टामस्करी करीत आमच्या हत्यारबंद पाहुण्यांना शंका घेण्यास जरा सुद्धां सवड न देतां त्या हॉटेलांतून सुखरूप बाहेर पडला.

'पण तुझें काय?'—अशा अर्थानें आम्ही चिंताग्रस्त दृष्टीनें लावलीकडे पाहिलें. पण जणूं काय त्याच्या गांवींहि ती गोष्ट नव्हती. शेवटीं त्यानें मूटभर खरबुजाच्या बिया तोंडांत टाकल्या आणि बेपर्वाईनें त्या चघळत चघळत तो म्हणाला, 'सगळे पदवीधर लोक आले आहेत. तर मग आतां आपण सभेला सुरवात करण्यास काय हरकत आहे?. 'होना? काय हरकत आहे?' आम्हीं सर्वांनीं एकमुखानें होकार दिला. 'पण अध्यक्ष महाराज अजून आले नाहींत? एक अंडरग्रॅज्युएट मध्येंच उद्गारला.

तेवढ्यांत अध्यक्षहि आले आणि सभेचें सर्वसाधारण काम सुरू झालें, अधूनमधून खाणेंपिणेंहि चाललेंच होतें. लावली शिपायाशीं गप्पा मारीत. बसला होता. त्यांचेशीं बोलण्यांत त्याला मोठा आनंद होत आहे अशीच कुणाचीहि समजूत झाली असती.

'तुमच्यावर नजर ठेवण्यासाठीं आम्हाला धाडावयाचें म्हणजे अगदींच मूर्खपणा आहे.' एक शिपाई बोलला; 'शिवाय सभेनंतर आम्हाला रिपोर्टहि लिहावा लागतो. आणि इथें पहावें तों काय? कांहींच भानगड नाहीं. आमची मात्र विनाकारण धांवपळ!'

'दोन महिने झाले. अजून आमचे पगार मिळाले नाहींत. आणि तरीहि काम हें करावेंच लागतें!' दुसऱ्यानें तक्रार केली.

यानंतर थोड्याच वेळानें शिपाई निघून गेले. तलावाच्या कांठीं भरलेल्या या विद्यार्थ्यांच्या सभेविषयीं तें पूर्ण निर्धास्त होतें. थोड्यावेळानंतर आम्ही सर्वजण एकामागून एक त्या चहागृहांतून बाहेर पडलों. कारण जर धरपकड व्हावयाचीच असेल तर सर्वजण एकदम सांपडू नयेत ही दृष्टि! आतां तसा एखादा कोणीं सांपडलाच तर नाइलाज, पण शक्य तों सावधगिरी घेतलीच पाहिजे. आम्हां सर्वांत लावलीचें तेथें राहाणें अधिक धोक्याचें होतें. पण तो पठ्या नेहमींप्रमाणें सर्वांच्या मागून बाहेर पडला.

उत्तरेकडील सडका नेहमीं दाट धुळीनें झांकलेल्या असतात. वाऱ्याच्या गर्जनेनें आकाश प्रतिनिनादित होत असतें. कोळशाच्या भुगा आणि जग-प्रसिद्ध अजस्त्र भिंतीपलीकडील वाळवंटांतील रेती बरोबर घेऊन मोठमोठीं वावटळें चकरा मारीत असतात. पावसाळ्याच्या दिवसांत वरुणमहाराज

मातीच्या ढिगाऱ्यांत घर करतात, यामुळें जरा कोठें पाय पडला कीं चिखलाचे शिंतोडे सगळीकडे उडतात.

लावली एका भिंतीजवळून, रस्त्याच्या कडेनें हातांत सायकल धरून, चिखलाचे खड्डे चुकवीत चुकवीत चालला होता. मी जेव्हां त्याला पाहिलें तेव्हां तो कसल्यातरी विचारांत गढून गेला होता. त्याच्या बुटांवर आणि कपड्यांवर चिखलाचे शिंतोडे उडत होते, तिकडेहि त्याचें लक्ष नव्हतें. मी त्याला हळूच धक्का दिला. तो दचकला. माझ्या स्वागत हास्यानें त्याच्या त्या गहन चिंतेला दूर हकलून लावलें.

'तुम्हांला झालंय् तरी काय?' मी विचारिलें. मी येथून जाऊं इच्छितों अगदीं हळू आवाजांत उत्तर मिळालें. 'अरेरे!, 'चला तुमच्या खोलीवर जाऊं. तुमच्याशीं मला बोलायचं आहे.!' जणूं त्यानें माझी परवानगी मागितली. माझी खोली तेथून जवळच होती. 'येथून निघून जाण्याचा तुम्हाला हुकूम झाला आहे काय?' 'छेः! मला स्वतःलाच तसें वाटूं लागलें आहे.' 'कां बरें?' तो कांहींसा लाजला. त्याच्या निळसर ओठांवर एक हास्याची लकेर उमटली. मीं त्याचेकडे निरखून पाहिलें, व विचारलें, 'तुमचें येथें घर आहे काय?' त्यानें होकारार्थी मान डोलावली. तो म्हणाला, 'माझें घर त्सी होई तईन गल्लींत आहे. चार वर्षें झालीं मी येथें—पेकिंगमध्यें—— काम करीत आहे. त्या गल्लीकडे माझे पाय मला न नेतील याची मी खबरदारी घेत असतों. पण आज अगदीं अचानकपणें होर्नीमन रस्त्यावर माझी पत्नि मला भेटली. तिनें मला ओळख देण्याचें धाडस केलें नाहीं. पण तिचे डोळे इतक्या कांहीं भावनावशतेनें आणि आवेगानें मजवर खिळून राहिले कीं माझ्या हृदयाला चटका बसला.' 'तुमची पत्नि तुमच्याबरोबर काम करूं शकत नाहीं काय?' मीं विचारलें. त्यानें मोठ्या उदासपणें मान डोलविली व पुढें बोलूं लागला, —'आणि मला एक लहानसा मुलगाहि आहे. मी या कामांत पडे-पर्यंत त्याचा जन्म झाला नव्हता. काल तोहि आपल्या आईबरोबर पावसांतून चालला होता...' लावलीनें आकाशाकडे डोळे लावले. जुन्या, फाटक्यातुटक्या व भिजलेल्या चटयांच्या तुकड्याप्रमाणें आकाशांत ढगांचे तुकडे इतस्ततः पसरले होते. 'आज जगामध्यें बाप असून अनाथ असणारीं अशीं मुलें किती असतील याची तुम्हांला कल्पना आहे का?' मी विचारलें. 'म्हणूनच मी येथून जाऊं

इच्छितों. इथं माझे आईवडीलहि आहेत. खरे म्हणजे मी अगदीं दुबळा आहे. स्वतःला कठोरपणानें त्या लोकांपासून दूर करण्याची हिम्मत माझ्यांत नाहीं. माझ्या मुलाला पावसाळ्यांत वापरण्यासाठीं टोपीसुद्धां मिळत नाहीं! मी जर त्याला स्वतःबरोबर बाळगूं शकलों असतों तर मीं त्याला एक छोटा कॉमरेड बनविला असता.' मी हंसण्याचा प्रयत्न केला, व म्हटलें 'निदान त्यानें आपल्या आजोबाचा नातू होऊन तरी व्हावें असेंच तुम्हांला वाटतें, नाहीं कां?' त्याचे डोळे पाणावलें. कांहींसें लालहि झाले. पण लागलीच तो हंसला व म्हणाला, 'छेः छे!' तसें नव्हे! तो कधीं ना कधीं एक मर्द पुरुष बनल्याखेरीज राहणार नाहीं याबद्दल माझी खात्री आहे. असा मर्द बनेल कीं जो आपल्या प्राणांचें आनंदानें बलिदान करील; पण कधींहि गुलामी व निमकहरामी मान्य करणार नाहीं!' 'तुम्ही त्याचा नाद सोडून द्या. त्याशिवाय कांहीं गत्यंतर नाहीं' मी तुटकपणें उद्गारले. पुन्हां सुती कपडे ठेवून दिले गेले; आणि गरम काढले गेले. दुसरा हिंवाळा येऊं लागला होता मी चरपोसला भेटायला गेले. तेथें दुसराहि एक माणूस होता. 'अजून एक माणूस येणार आहे, आपण थोडा-वेळ वाट पाहूं.' चरपोसनें सांगितलें. मी मजूरचा ताजा अंक वाचूं लागले, 'तुम्हाला माहीत आहे? लावली वारला!' चरपोसनें सांगितलें. 'वारला!' आम्ही दोघे एकदम उद्गारलों. 'उन्हाळ्यांत त्याला येथून निघून जाण्याचा हुकूम झाला आणि येथून गेल्यानंतर लागलीच......'

खोलींत एकदम स्तब्धता पसरली. माझें अन्तःकरण दगडासारखें जड झालें, एक हडकुळा गवतासारखा पांढुरका चेहेरा माझ्या समोर उभा राहिला. त्याचे डोळे दगदगीनें थिजून गेले होते.

मला वाटलें कीं मीच अजारी आहे; शरीरांत भयंकर आग होऊं लागली.

१९३२ सालची गोष्ट. लावलीला नार्मल स्कूलच्या विद्यार्थ्यांच्या चळवळींचें निरीक्षण आणि मार्गदर्शन करण्यासाठीं पावलिंगला धाडण्यांत आलें होतें. एका किसान कॉमरेडच्या शंकास्पद वागणुकीमुळें तो पकडला गेला.

'माझ्यावर विश्वास ठेवा. यापुढें मी सुस्त व आळशी राहणार नाहीं–' चरपोस म्हणत होता. त्याचा स्वर आतां पूर्वीसारखा मरतुकडा नव्हता. अगदींच नवीन पद्धतीनें तो बोलला; 'त्याला त्यांनीं उलटें टांगून घातलें अन् वेतानें फोडून काढलें. त्याचा एक आंगठा उखडला गेला...'

त्याच्या आवाजांत एक प्रकारचा जोश होता.—'आणि तिसऱ्या दिवशीं रात्रीं त्यांनीं त्याचा निकाल लावला!'

दरवाज्यावर चार टिचक्या वाजल्या. बरोबर चार.

'तो [ तिसरा माणूस ] येतोय! आतां आपल्याला आपलें काम लवकर संपवलें पाहिजे.' चरपोस म्हणाला.

★

IRBK-0102612

IRBK-0102612